मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २३० ■ शुक्रवार, ०१ मे २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# रस्त्यावरचा आवाज थेट विधान परिषदेत!

## प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांचा शिवसेनेत प्रवेश

मुंबई : आंदोलन करणाऱ्यांना सत्तेबाहेर ठेवण्याची परंपरा मोडीत काढत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठी खेळी केली आहे. बच्चू कडू यांना शिवसेनेत घेत थेट विधान परिषदेची उमेदवारी देत त्यांनी "रस्त्यावरचा आवाज थेट निर्णयप्रक्रियेत" आणण्याचा नवा राजकीय प्रयोग केला आहे.

या घडामोडीसोबतच शिवसेनेने विधान परिषद निवडणुकीसाठी दोन नावे जाहीर करत राजकीय समीकरणांना वेग दिला. बच्चू कडू यांच्यासह माजी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांना उमेदवारी देण्याची घोषणा स्वतः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. अर्ज भरण्याच्या अंतिम मुदतीला अवघे दोन तास शिल्लक असताना घेतलेल्या या निर्णयाने राजकीय वर्तुळात उत्सुकता शिगेला पोहोचली. शेवटच्या क्षणापर्यंत दुसऱ्या उमेदवाराबाबत सस्पेन्स कायम ठेवत शिंदेंनी आपल्या निर्णयक्षमतेचा ठसा उमटवला.

मुंबईत झालेल्या कार्यक्रमात बच्चू कडूंनी शिवसेनेत प्रवेश करत आपली भूमिका स्पष्ट केली. प्रहार संघटना पुढेही स्वतंत्र सामाजिक संघटना म्हणून कार्यरत राहणार असली तरी राजकीय लढा शिवसेनेच्या माध्यमातून उभारला जाईल, असे त्यांनी जाहीर केले. शेतकरी, दिव्यांग, कष्टकरी, दलित, शोषित आणि गोरगरीबांच्या प्रश्नांसाठी अधिक प्रभावीपणे काम करण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. पुढील वाटचाल पूर्णपणे एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालीच असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बच्चू कडू यांची ओळख ही आंदोलनातून उभी राहिलेली आहे. शेतकरी कर्जमाफीसाठी काढलेले मोर्चे, दिव्यांगांसाठी उभारलेले आंदोलन, तसेच गोरगरीब, शोषित



आणि पीडित घटकांसाठी सातत्याने रस्त्यावर उतरून लढा देत त्यांनी स्वतःची वेगळी छाप निर्माण केली, असे शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले.

बच्चू कडू यांच्या आंदोलनांमुळे सरकारला कर्जमाफीसारखे महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागले, याची आठवणही एकनाथ शिंदे यांनी करून दिली. यावेळी बोलताना शिंदेंनी बच्चू कडूंच्या लढाऊ स्वभावाचे कौतुक करत अन्यायाविरुद्ध लढा हा बाळासाहेबांच्या विचारांचा गाभा असल्याचे सांगितले. "आपले आणि बच्चू कडू यांचे विचार एकच सर्वसामान्यांना न्याय देणे," असे स्पष्ट करत त्यांनी सामाजिक लढ्याला राजकीय ताकदीची जोड देण्याची गरज अधोरेखित केली. "मी एकदा शब्द दिला की तो पाळतो," असे ठामपणे सांगत त्यांनी आपल्या नेतृत्वशैलीवर शिक्कामोर्तब केले.

या संपूर्ण घडामोडीतून एक महत्त्वाचा संदेश समोर आला आहे. सामाजिक आंदोलन यशस्वी व्हायचे असेल तर त्याला राजकीय ताकद आवश्यक असते. बच्चू कडूंना थेट विधान परिषदेसाठी संधी देत शिंदेंनी आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्याला थेट निर्णय प्रक्रियेत स्थान देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे "कार्यकर्ता ते निर्णयकर्ता" हा प्रवास प्रत्यक्षात साकारताना दिसत आहे.दरम्यान, प्रहार संघटना स्वतंत्र सामाजिक संघटना म्हणून कायम राहणार असली तरी ती शिवसेनेशी संलग्न राहील. त्यामुळे रस्त्यावरची ताकद आणि सत्तेची ताकद एकत्र येऊन सामाजिक प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडले जातील, असे चित्र निर्माण झाले आहे.

बच्चू कडूंनीही हा प्रवेश केवळ उमेदवारीसाठी नसून विचारांच्या एकतेसाठी असल्याचे स्पष्ट केले माजी उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या अनुभवालाही या निर्णयात महत्त्व देण्यात आले आहे. विधान परिषदेत केलेले त्यांचे काम, महिलांच्या प्रश्नांवर घेतलेली आक्रमक भूमिका आणि संघटनात्मक योगदान लक्षात घेता त्यांच्यावर पुन्हा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.त्यामुळे एका बाजूला आंदोलनातून आलेले नेतृत्व आणि दुसऱ्या बाजूला अनुभवी नेतृत्व असे संतुलन साधण्याचा प्रयत्न दिसून येतो.

अर्ज भरण्याची अंतिम मुदत दुपारी तीन वाजेपर्यंत असताना अखेरच्या दोन तासांत उमेदवारी जाहीर होणे हा राजकीय थरार ठरला. या सर्व घडामोडींमुळे विधान परिषद निवडणुकीकडे राज्याचे लक्ष लागले आहे.याच वेळी शिंदेंनी राष्ट्रीय राजकारणावर भाष्य करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश आर्थिक महासत्तेकडे वाटचाल करत असल्याचा दावा केला आणि आगामी काळात पश्चिम बंगालचा आसाम मध्ये मोठे राजकीय परिवर्तन होईल, असा विश्वास व्यक्त केला.

एकूणच, बच्चू कडूंचा शिवसेनेत प्रवेश हा केवळ राजकीय घटना न राहता आंदोलनाला थेट सत्तेत स्थान देण्याचा प्रयोग ठरत आहे. एकनाथ शिंदे यांनी या निर्णयातून पारंपरिक राजकारणातील भिंती मोडत कार्यकर्त्यांना थेट निर्णय प्रक्रियेत आणण्याचा नवा मार्ग दाखवला आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणात "आंदोलन ते निर्णय" हा नवा अध्याय सुरू झाल्याचे स्पष्ट होत आहे.यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत, शिवसेना सचिव संजय मोरे, आमदार मुरजी पटेल आणि शिवसेना आणि प्रहार संघटनेचे सर्व प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते तसेच दिव्यांग बांधव यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुंबई पोलिस उपायुक्त श्री. बजरंग बनसोडे यांना मानाचे 'पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह' जाहीर

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/ मारुती सत्रे** : मुंबई पोलीस दलातील कर्तव्यदक्ष अधिकारी आणि विद्यमान पोलीस उपायुक्त श्री.बजरंग बनसोडे यांना त्यांच्या उल्लेखनीय व उत्कृष्ट सेवेसाठी महाराष्ट्र राज्याचे अत्यंत मानाचे 'पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह'(DGP Insignia) जाहीर झाले आहे.त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे पोलीस दलासह सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**कर्तव्यनिष्ठेची पावती**

श्री.बजरंग बनसोडे यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात विविध महत्त्वाच्या पदांवर काम करताना शिस्त, धाडस आणि कौशल्यपूर्ण नेतृत्व दाखवले आहे.



गुन्हेगारी नियंत्रण,कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच कठीण परिस्थितीत दाखवलेली समयसूचकता आणि निर्णयक्षमता या गुणांच्या आधारे त्यांची या सन्मानासाठी निवड करण्यात आली आहे.

**सन्मानचिन्हाचे महत्त्व**

पोलीस दलात १५ वर्षांहून अधिक काळ निष्कलंक व उत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या निवडक अधिकाऱ्यांनाच हे सन्मानचिन्ह प्रदान केले जाते.

पोलीस महासंचालकांकडून दिले जाणारे हे पदक पोलीस दलातील अत्यंत प्रतिष्ठेच्या सन्मानांपैकी एक मानले जाते.

इतर पुरस्कार व गौरव (Awards & Medals)

श्री. बनसोडे यांच्या कारकिर्दीत अनेक उल्लेखनीय सन्मान प्राप्त झाले आहेत, त्यामध्ये —

केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक (ऑपरेशन्स) – २०२४

(NIA मधील उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रदान)

DG,NIA सिल्वर कमेंडेशन रोल – २०२५

तसेच ३ वर्षांच्या प्रतिनियुक्तीदरम्यान (deputation) उत्कृष्ट सेवेसाठी २७ कमेंडेशन सर्टिफिकेट्स (CC)

सेवाकाळात एकूण १५६ बक्षिसे/ पुरस्कार (Rewards) प्राप्त

**सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव**

श्री.बजरंग बनसोडे यांच्या या यशाबद्दल वरिष्ठ अधिकारी, सहकारी कर्मचारी तसेच विविध सामाजिक स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

त्यांच्या या यशामुळे मुंबई पोलीस दलाचा मान उंचावला असून,तरुण अधिकाऱ्यांसाठी ते प्रेरणास्थान ठरत आहेत.

**समाजासाठी प्रेरणादायी कार्य**

शिस्तबद्ध कामकाज,कर्तव्यनिष्ठा आणि जनतेप्रती असलेली बांधिलकी यामुळे श्री.बनसोडे यांनी आपल्या कार्यातून एक आदर्श निर्माण केला आहे.त्यांचा हा सन्मान म्हणजे केवळ वैयक्तिक यश नसून संपूर्ण पोलीस दलासाठी अभिमानाची बाब आहे.

## आष्टी (ता. हदगाव) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**आष्टी (प्रतिनिधी) /विश्वदीप कांबळे** : सुभेदार रामजी भिम मंडळाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प व्यक्त केला.या कार्यक्रमाला नांदेड वाघाळा महानगरपालिकेचे गटनेते तसेच वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष इंजिनीयर प्रशांत दादा इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करत आष्टी येथे त्यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाला जयंती मंडळाचे अध्यक्ष धम्मपाल ज्ञानेश्वर कांबळे, उपाध्यक्ष संघर्ष दयाळ वाघमारे यांच्यासह



गावातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यामध्ये संजय कांबळे, विजयकुमार वाघमारे, अमोल कांबळे, राहुल कांबळे, पंकज वाघमारे, सुनील जाधव, अशोक वाघमारे, विकास वाघमारे, वैभव वाघमारे, सत्यपाल कांबळे, निशांत गायकवाड आदींचा सहभाग होता.यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी हजेरी लावून कार्यक्रम यशस्वी केला. बाबासाहेबांच्या विचारांचा प्रचार-प्रसार करून समाजाच्या उन्नतीसाठी कार्य करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

## पनवेल मधील आदिवासी विक्रेत्यांसाठी स्वतंत्र आदिवासी हक्काचा बाजार उपलब्ध करण्याची मनसेची मागणी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : पनवेल तालुक्यातील भूमिपुत्र आदिवासी विक्रेत्यांसाठी स्वतंत्र आदिवासी हक्काचा बाजार उपलब्ध करून देण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पनवेलचे उपायुक्त यांच्याकडे पत्राद्वारे केली. अनेक वर्षांपासून पनवेल तालुक्यातील आदिवासी समाज सह्याद्रीच्या डोंगर रांगांमधून आणि जंगलातून मिळणाऱ्या रानभाज्या, फळे, औषधी वनस्पती आणि इतर नैसर्गिक उत्पादने पनवेल शहरात येऊन विकत आहेत. ही केवळ परंपरा नसून आदिवासी नागरिकांचे उपजीविकेचे साधन आहे. मात्र भविष्यात पनवेल महानगरपालिकेकडून रस्त्यावर बसणाऱ्या आदिवासी




विक्रेत्यांवर कारवाई केली जाऊ शकते आणि त्यांना व्यवसाय करण्यापासून रोखले जाऊ शकते. पनवेल मधील आदिवासींना केवळ सरकारी मदतीची किंवा अनुदानाची गरज नाही तर त्यांना सन्मानाने जगण्याचे संधीची गरज आहे. त्यांना त्यांच्या हक्काची जागा मिळावी आणि त्यांच्या पारंपारिक कौशल्याने योग्य बाजारपेठ मिळावी अशी मागणी मनसेच्या वतीने करण्यात आली. यावेळी मनसेचे पनवेल महानगर सचिव पराग बालड, रोहन पाटील उपशहराध्यक्ष, पनवेल उपस्थित होते.

## निफाड तालुक्यात अतिक्रमणविरोधी मोठी मोहीम; 12 ते 14 मेदरम्यान शिवरस्ते मोकळे होणार

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यात अतिक्रमणामुळे बंद पडलेले शिवरस्ते, शिवार रस्ते आणि पारंपरिक पाणंद मार्ग पुन्हा सुरू करण्यासाठी प्रशासनाने व्यापक मोहीम जाहीर केली आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, महसूल विभाग आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त समन्वयातून ही कारवाई 12 ते 14 मे 2026 दरम्यान राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेअंतर्गत उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालयामार्फत संबंधित रस्त्यांची सविस्तर मोजणी पूर्ण करण्यात आली असून, प्रत्येक मार्गाच्या अधिकृत हद्दी निश्चित करण्यात आल्या आहेत. अतिक्रमण झालेल्या ठिकाणांची अचूक नोंद घेऊन कारवाईसाठी प्रशासन सज्ज झाले आहे.

कारवाई प्रभावीपणे पार पाडण्यासाठी महसूल, भूमि अभिलेख, पोलीस आणि स्थानिक प्रशासन यांच्यात समन्वय साधण्यात आला आहे. मंडळ अधिकारी, तलाठी, सर्वेक्षक आणि पोलीस अधिकारी यांना स्पष्ट जबाबदाऱ्या देण्यात आल्या असून नियोजनबद्ध पद्धतीने मोहीम राबविण्यात येणार आहे.ठरलेल्या वेळापत्रकानुसार कारवाई 12 मे रोजी सकाळी 10 वाजल्यापासून ओझर, सायखेडा, रानवड-चांदोरी, लासलगाव, पिंपळगाव बसवंत, विंचूर-पालखेड आदी भागांमध्ये विविध शिवरस्त्यांवरील अतिक्रमण हटविण्याची कारवाई होणार आहे. तर 14 मे रोजी नांदूर मध्यमेश्वर परिसरात कारवाई निश्चित करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांना पूर्वसूचना अतिक्रमण केलेल्या शेतकऱ्यांना किमान सात दिवस आधी लेखी नोटीस देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. स्वखर्चाने अतिक्रमण काढून घेण्याची संधी देऊन कायदेशीर कारवाई टाळण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे.

न हटवल्यास थेट कारवाई निर्धारित मुदतीत अतिक्रमण न काढल्यास प्रशासन पोलीस बंदोबस्तात थेट कारवाई करणार असून, संपूर्ण प्रक्रिया कायदेशीर चौकटीत पार पडेल.\जिओ-टॅगिंगसह पारदर्शकता कारवाईदरम्यान प्रत्येक ठिकाणाचे जिओ-टॅगिंग व छायाचित्रण करण्यात येणार असून, सविस्तर अहवाल वरिष्ठांना सादर केला जाणार आहे.

या मोहिमेमुळे अनेक वर्षांपासून बंद असलेले शेतरस्ते पुन्हा खुले होणार असून, शेतकऱ्यांना शेतात जाणे सोपे होईल. परिणामी ग्रामीण दळणवळण सुधारून शेतीकामांना मोठा दिलासा मिळणार आहे.

एकंदरीत, निफाड तालुक्यातील ही मोहीम अतिक्रमणविरोधी ठोस पाऊल ठरत असून ग्रामीण विकासाला नवी गती देणारी ठरणार आहे.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेचे अनुकरण करून सर्वत्र वृक्षारोपण व्हावे

३० एप्रिल १९०९ रोजी अमरावती जिल्ह्यातील यावली येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा जन्म झाला त्यांचे मूळ नाव माणिक बंडोजी ठाकूर होते.जनुकाय एक चमकता तारा या पृथ्वीवर उदयास आला की काय असे वाटायला लागले.आपण पहातो की, कोणतेही युद्ध जिंकण्यासाठी शस्त्र आवश्यक असते यात तलवार,बंदुक, दारूगोळा किंवा इतर शस्त्रांचा वापर केला जातो.परंतु ईश्वराने जनुकाय इंग्रजांशी लढा देण्यासाठी व राष्ट्रहितासाठी तुकडोजी महाराजांना "खंजिरी" हे शस्त्र दिले की काय असे त्यावेळी सर्वांनाच वाटु लागले. खंजिरी दिसायला जरी छोटी असली तरी समाज प्रबोधनाच्या दृष्टीने आणि इंग्रजांच्या मानगुटीवर बसणारे तीक्ष्ण (धारदार)शस्त्र होते.तुकडोजी महाराजांनी (खंजिरी)या शस्त्राने एकाच वेळी दोन बाजू साध्य केल्या त्यामध्ये समाजातील भेदभाव दूर करून समाजात एकता व अखंडता प्रबोधनाच्या माध्यमातून निर्माण करून जनजागृती निर्माण केली आणि दुसरे अत्यंत महत्त्वाचे म्हणजे इंग्रजां विरूध्द लढा उभारण्यासाठी खंजिरीच्या माध्यमातून संपूर्ण जनता एकत्र येणे व स्वतंत्र लढा यशस्वी करणे हा मुख्य उद्देश तुकडोजी महाराजांचा होता आणि तो साध्य करून दाखविला.कारण त्याकाळी त्यांच्या खंजिरीचा आवाज संपूर्ण भारतात गुंजत होता अशा परिस्थितीत इंग्रजांमध्ये सुध्दा भितीचे वातावरण निर्माण झाले होते. यावरून स्पष्ट होते तुकडोजी महाराजांच्या खंजिरीने इंग्रजांची झोप उडाली व धाबे दणाणून सोडले होते.कारण त्याकाळी तुकडोजी महाराजांनी खंजिरीच्या बळावर संपूर्ण देश एकत्र करून स्वतंत्र संग्रामाची जोत प्रज्वलित करण्याचे महान कार्य केले आणि खंजिरीच्या माध्यमातून प्रबोधन देवून स्वतंत्र लढा उभारण्यासाठी तुकडोजी महाराजांनी लाखमोलाची कामगिरी केली. खंजिरीच्या माध्यमातून भजन, कीर्तन, प्रवचन करून समाजामध्ये जनजागृती निर्माण करून समाजात बंधुभाव निर्माण व्हावा आणि इंग्रजांविरूध्द लढण्यासाठी संपूर्ण समाजबांधव एकत्रित करून खंजिरीच्या माध्यमातून इंग्रजांना धारेवर धरले आणि समाजात जनजागृती निर्माण केली.तुकडोजी महाराजांचे महान कार्य पाहून संपूर्ण देश आश्चर्यचकित झाला.अशा परिस्थितीत त्यांच्या सामाजिक, आध्यात्मिक आणि राष्ट्रीय कार्याची दखल घेऊन तुकडोजी महाराजांना 'राष्ट्रसंत' ही पदवी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी बहाल केली होती. त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात दिलेले योगदान, 'ग्रामगीता' ग्रंथातून दिलेला सामाजिक संदेश आजही समाजात प्रभावी आहेत.खंजिरी भजनाच्या माध्यमातून त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन, ग्रामविकास आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी मोठे योगदान दिले. आत्मसंयमनाचे विचार त्यांनी ग्रामगीता या काव्यातून मांडले. त्यांनी मराठी व हिंदी भाषांमध्ये काव्यरचना केली आहे. तुकडोजी महाराजांनी १९३५ साली मोझरी येथे गुरुकुंज आश्रमाची स्थापना केली. खंजिरी भजन हा प्रकार त्यांच्या प्रबोधनाचे वैशिष्ट्य होते. तुकडोजी महाराज हे आधुनिक काळातील महान संत होते. आडकोजी महाराज हे त्यांचे गुरू. विदर्भात त्यांचा विशेष संचार असला तरी महाराष्ट्राभरच नव्हे तर देशभर हिंडून ते आध्यात्मिक, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन करीत होते. एवढेच नव्हे तर जपान सारख्या देशात जाऊन त्यांनी सर्वांना विश्वबंधुत्वाचा संदेश दिला. सन १९४२ च्या भारत छोडो आंदोलनादरम्यान काही काळ त्यांना अटक झाली होती. “आते है नाथ हमारे” हे त्यांनी रचलेले पद या काळात स्वातंत्र्यलढ्यासाठी स्फूर्तिगान ठरले होते.ग्रामगीतेच्या माध्यमातून त्यांनी गावाचा विकास, नैतिकता आणि सुसंस्कृत जीवनाचा मार्ग दाखवला आहे.देशात राष्ट्रीय एकात्मता निर्माण व्हावी यासाठी त्यांनी गावोगावी'गुरुदेव सेवा मंडळा'ची स्थापना केली, ज्याद्वारे भजनाच्या माध्यमातून लोकांमध्ये सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन केले राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे केवळ संत नव्हते, तर ते एक प्रगल्भ विचारवंत व देशभक्त होते. त्यांनी 'गावाचा विकास म्हणजेच राष्ट्राचा विकास' हा मुलमंत्र दिला. त्यांचे कार्य आणि विचार आजही ग्रामविकासासाठी प्रेरणादायी आहेत. तुकडोजी महाराज हे आधुनिक काळातील महान संत होते.संत तुकडोजी महाराजांचे कार्य संपूर्ण मानवतेसाठी आणि देशासाठी प्रेरणादायी आहे.या महान विभूतीची जोत ३१ ऑक्टोबर, १९६८ रोजी मावळली व संपूर्ण देश स्तब्ध झाला.अशा प्रकारे आपले संपूर्ण जीवन राष्ट्रहितासाठी समर्पित करून देशाला महत्वपूर्ण दिशा. त्यामुळे आज राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या कार्याचे सर्वांनीच अनुकरण करण्याची आवश्यकता आहे. आज बदलत्या हवामानामुळे,प्रदुषण,औद्योगिक, शहरीकरण, जंगलतोड,यामुळे निसर्गाचे संतुलन डगमगतांना दिसत असून पृथ्वी भयभीत आहे.यामुळे विदर्भासह संपूर्ण देशात सुर्य आग ओकतांना दिसतो देशातील काही भागात तापमान ४० अंश सेल्सिअसच्यावर आहे काही भागात ४६ अंश सेल्सिअस पर्यंत पोचले आहे.हा सर्वप्रकार पृथ्वीचे संतुलन बिघडल्यामुळे निर्माण झालेली भयावह परिस्थिती आहे.आता राज्यासह देशातील अनेक भागात" एल निनो"मुळे पाणी टंचाई व दुष्काळाचे सावट निर्माण होण्याची दाट शक्यता आहे.यापासुन बचावासाठी राज्यासह देशात मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड अत्यंत गरजेचे आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यासह देशातील जनतेनी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली पाहिजे यामुळे हवामानाचे संतुलन स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल आणि सर्वांना शुद्ध हवा, ऑक्सिजन, सावली व गुरांना चारा मिळेल आणि आपल्याला प्रत्येक झाडाच्या, पानात, फुलात,फळात,मुळात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे अवश्य दर्शन होईल.कारण संत तुकडोजी महाराजांचा सहवास सर्वात जास्त वृक्षांच्याच सानिध्यात रहाला आहे. त्यामुळे आजच्या दिवशी वृक्षलागवड करून राष्ट्रसंतांना नमन करू या.जय हिंद.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )नागपूर.**

# बुद्ध जयंती निमित्त धम्म प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

## समता भूमी गुरढा येथे ३ मे रोजी एकदिवसीय उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे/भंडारा** : भारतीय बौद्ध परिषद सर्कल कनेरी/दगडी (६० गावे) यांच्या वतीने बुद्ध जयंतीच्या पार्श्वभूमीवर एकदिवसीय धम्म प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर रविवार, दि. ३ मे २०२६ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पार पडणार आहे.

सदर शिबिराचे ठिकाण सम्यक बुद्ध विहार, समता भूमी, गुरढा येथे आहे. या शिबिरात धम्माचे सखोल मार्गदर्शन, जीवनात सकारात्मक बदल घडविणारे विचार, तसेच बौद्ध तत्त्वज्ञानाचे व्यावहारिक आचरण यावर विशेष भर दिला जाणार आहे.शिबिराचे मार्गदर्शन धम्मचारी निर्मलबंधु (नागपूर) व धम्मचारी जिनसागर (मुंबई) करणार असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली ध्यान, वंदना, पूजन, गटचर्चा व धम्म अभ्यास सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. “बुद्ध धम्माचा प्रचार-प्रसार करणे हीच खरी मानवसेवा” या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित हे शिबिर सहभागींच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडविण्यास सहाय्यभूत ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

शिबिरात सहभागी होण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नसून, सर्व जाती-धर्म व पंथातील नागरिकांसाठी हे शिबिर खुले आहे. मात्र, पाच वर्षांखालील मुलांना प्रवेश दिला जाणार नाही. सहभागींनी स्वतःचे लेखन साहित्य व शाकाहारी जेवणाचा डबा सोबत आणावा, असे आवाहन करण्यात आले आहे.भारतीय बौद्ध परिषद सर्कल कनेरी/दगडी व त्रिरत्न बौद्ध महासंघ तर्फे आयोजित या शिबिरात मोठ्या संख्येने उपस्थित राहून धम्मज्ञानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज/30 एप्रिल / जन्मदिनविशेष

२३ जुलै १९५५ रोजी जपानमध्ये झालेल्या जागतिक धर्म परिषदेत एक संन्यासी बोलण्यासाठी उभे राहिले. श्रोत्यांना त्यांची भाषा समजत नव्हती, तरी त्यांच्या चेहऱ्यावरील भाव, कीर्तनातील मधुर स्वर आणि आध्यात्मिक ओज यामुळे संपूर्ण वातावरण भारावून गेले. श्रोते मंत्रमुग्ध झाले. हे प्रभावी व्यक्तिमत्त्व म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज.

तुकडोजी महाराजांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी महाराष्ट्रातील यावली या गावात झाला. त्यांचे वडील बंडोजी इंगळे आणि आई मंजुळा देवी. अनेक नवसांनंतर झालेल्या या मुलाचे नाव ‘माणिक’ ठेवण्यात आले.त्यांचे वडील चारण होते. ते श्रीमंत, जमीनदार आणि राजांकडे जाऊन त्यांच्या वंशपरंपरेचे गुणगान करत असत. माणिकच्या जन्मानंतर त्यांनी हा व्यवसाय सोडून शिवणकाम सुरू केले, नंतर गूळ विकण्याचा प्रयत्न केला; परंतु प्रत्येक वेळी त्यांना अपयश आणि गरिबीच मिळाली.

माणिक लहानपणी शाळेत जात असे, पण त्याचे मन अभ्यासापेक्षा भजन-कीर्तनात अधिक रमायचे. तो चांद्यातील मारुती मंदिराजवळ ढपली वाजवून भजन करणाऱ्या ‘भारती’ नावाच्या गायकाजवळ बसत असे. नंतर कुटुंब गावाकडे परतले आणि तेथील शिवमंदिर हेच त्याच्या साधनेचे केंद्र बनले. पुढे त्याला आईच्या माहेरी बरखेड येथे पाठविण्यात आले, जिथे त्याने चौथीपर्यंत शिक्षण घेतले.

बरखेड येथे त्याला आईचे गुरु आडकुजी महाराज यांचे सान्निध्य लाभले. भजन गाताना त्याला रोटीचे तुकडे मिळत असत, त्यामुळे त्याचे नाव ‘तुकड्या’ पडले आणि पुढे ते ‘तुकडोजी’ झाले. वयाच्या १२ व्या वर्षी त्यांचे गुरु समाधीस्थ झाले.

भगवान विठ्ठलाच्या दर्शनासाठी ते पंढरपूर येथे गेले, पण तेथे पुजाऱ्यांनी त्यांना नाकारले. त्यानंतर त्यांनी पुंडलिक मंदिराला भेट दिली. पुढे ते काही काळ गावात राहून मजुरी करू लागले. वयाच्या १४ व्या वर्षी त्यांनी घर सोडून जंगलात जाऊन साधना केली.

तेथे त्यांची भेट एका योगीशी झाली, ज्यांनी त्यांना योग, प्राणायाम आणि ध्यान यांचे शिक्षण दिले. काही काळानंतर योगी अदृश्य झाले, पण तुकडोजींनी साधनेत प्रगती केली.

नंतर ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. त्यांची भेट महात्मा गांधी यांच्याशी झाली, परंतु त्यांचा मार्ग काहीसा वेगळा होता. त्यांच्या ओजस्वी भजनांमुळे ब्रिटिश सत्तेला धक्का बसत होता. त्यामुळे २८ ऑगस्ट १९४२ रोजी त्यांना अटक करण्यात आली.

कारागृहातून सुटल्यानंतर त्यांनी समाजसेवा आणि जनजागृतीला वाहून घेतले. त्यांनी ‘गुरुदेव सेवा मंडळ’ ची स्थापना करून गावोगावी त्याच्या शाखा सुरू केल्या. या शाखांची संख्या एका काळात ७५,००० पर्यंत पोहोचली. गोरक्षण, ग्रामविकास, व्यसनमुक्ती, समरसता आणि कुष्ठसेवा यांसारखे अनेक उपक्रम त्यांनी राबवले.

**“राष्ट्रसंत”**

त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी त्यांना ‘राष्ट्रसंत’ ही उपाधी दिली. १९५३ मध्ये त्यांनी ‘ग्राम गीता’ हा ग्रंथ लिहिला, ज्यात ग्रामविकासाचे तत्त्वज्ञान मांडले आहे. १९६४ मध्ये स्थापन झालेल्या विश्व हिंदू परिषद च्या स्थापनेच्या वेळीही ते उपस्थित होते.

आयुष्याच्या शेवटच्या काळात त्यांनी सर्व कार्य आपल्या सहकाऱ्यांकडे सोपवले आणि ११ ऑक्टोबर १९६६ रोजी त्यांनी देह ठेवला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे समाजजागृती, आध्यात्म आणि राष्ट्रसेवा यांचा अद्वितीय संगम होते.

**डॉ. सुनिल भगत**

# १३ वर्षे पूर्ण; तरीही ‘भेल प्रकल्प’ अपूर्ण - भंडाऱ्यात प्रतीकात्मक पुण्यतिथी आंदोलन

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे /भंडारा** - भंडारा जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी महत्त्वाचा मानला जाणारा भेल (BHEL) प्रकल्प १३ वर्षे पूर्ण होऊनही अद्याप अपूर्णच असल्याने स्थानिक नागरिक आणि युवकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर १३ मे २०२६ रोजी प्रकल्पाच्या “प्रतीकात्मक पुण्यतिथी”चे आयोजन करण्यात आले असून, प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.




२०१३ साली मोठ्या अपेक्षांनी सुरू झालेल्या या प्रकल्पाकडून हजारो युवकांना रोजगार मिळेल, असा विश्वास होता. मात्र, १३ वर्षांनंतरही प्रकल्प रखडल्यामुळे बेरोजगारीत वाढ झाली असून, अनेक युवकांची स्वप्ने भंगली आहेत. “औद्योगिक प्रगती केवळ कागदावरच राहिली आहे,” अशी टीका आयोजकांकडून करण्यात आली आहे.

आंदोलनाचे आयोजक ‘भेल संघटना, मुंडीपार’ यांनी सांगितले की, प्रकल्प लवकरात लवकर सुरू करावा, बेरोजगारांना न्याय द्यावा आणि भंडारा जिल्ह्याचा औद्योगिक विकास गतीमान करावा, या मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येत आहे.

सदर आंदोलन दिनांक १३ मे २०२६ रोजी सकाळी ८ वाजताभंडारा येथे होणार आहे. या वेळी “गोडाऊन मंत्र्यांना भावपूर्ण श्रद्धांजली” अर्पण करून शासनाच्या निष्क्रियतेचा निषेध व्यक्त करण्यात येणार आहे.

तसेच “आता तरी प्रकल्प सुरू करा!” अशी जोरदार मागणी केली जाणार आहे.

# श्री राजेंद्र प्रसाद माकणे यांचा सन्माननीय सेवानिवृत्ती सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**रणिता ठाकूर मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिकेत 33 वर्षांची यशस्वी शासकीय सेवा बजावल्यानंतर कार्यकारी अभियंता पदावर कार्यरत असलेले शिक्षणप्रेमी व कर्तृत्ववान अधिकारी श्री राजेंद्र प्रसाद माकणे आज दिनांक 30 एप्रिल 2026 रोजी सन्मानपूर्वक सेवानिवृत्त होत आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील अत्यंत साध्या व गरीब कुटुंबात जन्मलेल्या माकणे सरांनी प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षणाची आवड जोपासत आपला जीवनप्रवास घडविला. बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेत टेलिफोन ऑपरेटर म्हणून सेवेला सुरुवात केली. नोकरी सांभाळत त्यांनी साबू सिद्दीकी पॉलिटेक्निकमधून पार्ट-टाइम डिप्लोमा






पूर्ण केला.

त्यानंतर त्यांच्या कष्ट व जिद्दीमुळे त्यांना ज्युनियर पदावर पदोन्नती मिळाली. एवढ्यावर न थांबता त्यांनी सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयातून स्थापत्य अभियांत्रिकी (Bachelor of Engineering) पदवी संपादन केली. याच गुणवत्तेच्या बळावर त्यांची सब इंजिनिअर पदावर निवड झाली. पुढे त्यांच्या प्रामाणिक सेवा, नेतृत्वगुण व कार्यक्षमतेचा गौरव करत बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांना कार्यकारी अभियंता या उच्च पदावर पदोन्नती देऊन सन्मानित केले.

गरिबीतून उभारी घेत शिक्षण व मेहनतीच्या जोरावर उच्च स्थान गाठणारे माकणे सर हे आजच्या तरुणांसाठी प्रेरणादायी आदर्श ठरले आहेत. त्यांच्या मनमिळाऊ स्वभावामुळे आणि सहकार्यशील वृत्तीमुळे त्यांनी सर्व सहकाऱ्यांच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय सेवेसाठी आणि उज्ज्वल कारकिर्दीसाठी सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत असून, त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# महात्मा फुले महाविद्यालयामध्ये पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नविन पनवेल** : रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये गुरुवार ३० एप्रिल २०२६ रोजी पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभचे आयोजन करण्यात आले होते. या समारंभास रामशेठ ठाकूर अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तर शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू व महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबईचे माजी चेअरमन डॉ. देवानंद शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी पाहुण्यांच्या हस्ते महाविद्यालयातील पदवीधर व पदव्युत्तर स्नातकांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आली.

रयत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य व महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे चेअरमन रामशेठ ठाकूर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्व विशद केले. पदवी प्राप्त




करणा-या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत त्यांनी आजच्या बदलत्या युगासोबत स्वत:मध्ये बदल करत आपल्या आयुष्यातील ध्येय पुढे ठेऊन चालावे. ‘थांबला तो संपला’ या म्हणी प्रमाणे विद्यार्थ्यांनी आदर्श नागरिक म्हणून जीवन कसे जगता येईल यासाठी प्रयत्न करावा. तसेच विद्यार्थ्यांनी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील, महात्मा ज्योतिबा फुले,महात्मा गांधी अशा थोर महापुरुषांचा आदर्श घेऊन स्वत:च्या भविष्याची वाटचाल करावी.

शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू मा. डॉ. देवानंद शिंदे यांनी विद्यार्थ्यांना रयत शिक्षण संस्थेचा वारसा पुढे घेऊन आपण चाललो आहोत. महात्मा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील महात्मा फुले, कर्मवीर भाऊराव यांसारखे आदर्श व्यक्तिमत्त्व आपले आदर्श आहेत अश्या आदर्श व्यक्तिचे चरित्र जरुर वाचावे. त्यातूनच आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो. आयुष्यात स्वप्न मोठे पहा. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात अशक्य हे काहीच नाही. यश मिळवण्यासाठी संयम पाहिजे अनेक संधीचे दरवाजे विद्यार्थ्यांसाठी खुले आहेत. तसेच विद्यार्थीनी नौकरीच्या मागे न लागता व्यवसाय ही केला पाहिजे. पुढे ते म्हणाले की जिथे कुठे ही तुम्ही संशोधक,शिक्षक,उद्योजक,व्यापारी व्हाल ! तिथे तुम्ही सर्वोत्कृष्ट व्हा ! आणि एक जबाबदार नागरिक म्हणून देशाची सेवा करा असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ रमेश म्हात्रे, डॉ. लक्ष्मण गवळी, प्रा. जनार्दन वारघडे तसेच विद्यार्थी व विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अवैध लाकूड वाहतूक करणारी ट्रक वनविभागाच्या जाळ्यात ; १८४२ टन मुद्देमाल जप्त

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव तालुक्यातील निमखेडी शिवारातून अवैधरित्या विविध वृक्षांची लाकडाची तोड करून वाहतूक करणाऱ्या ट्रकला वनविभागाने घोसला गावाजवळ सापळा रचून पकडल्याची घटना मंगळवारी रात्री नऊ वाजता ही कारवाई केली.या कारवाई मध्ये एक हजार८४२ टन विविध झाडांची लाकडे ट्रक सह जप्त करून सदर ट्रक रात्री सोयगाव वनविभाग कार्यालयात जमा करण्यात आला आहे

तालुक्यातील निमखेडी शिवारात पळस, लिंब,बेहेडा,आदी वृक्षांची अवैध तोड करून ट्रक भरण्यात येत असल्याची होत असल्याची माहिती वनविभागला मिळताच वनपाल मुक्तार अली,वनरक्षक निलेश मुलताने,वनरक्षक सुप्रिया चौधरी यांच्या पथकाने घोसला गावाजवळ सापळा रचून मंगळवारी रात्री नऊ वाजता ट्रक क्र-एम एच-१८,बी जी-६९४१ ताब्यात घेतला दरम्यान हा ट्रक



मालेगाव येथील असल्याचे वनपाल मुख्तार अली यांनी सांगितले यामध्ये लिंब,बेहेडा,आदी विविध झाडांची लाकडे होती पथकाने रीतसर कार्यवाही करून सदर वाहन व त्यातील माल जप्त केला.सदर कार्यवाही सुवर्णा माने उपवनसंरक्षक (प्रा) छत्रपती संभाजी नगर,सहायक वनसंरक्षक स्वप्नील भामरे सिल्लोड यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी अनिल मिसाळ,वनपाल मुख्तार अली,वनरक्षक सुप्रिया चौधरी, वनरक्षक नितेश मुलताने, मोहन चौधरी आदींनी केली.

# विदर्भप्रेमी 1 मे, महाराष्ट्र दिन "काळा दिवस" म्हणून का पाळतात ?

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : विदर्भ पौराणिक काळापासून तर पुढे प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन युगात एक संपन्न, सुपीक आणि समृद्ध प्रदेश म्हणून ओळखला जायचा. निसर्गाने या प्रदेशावर अक्षरशः उधळण केली आहे. विस्तीर्ण पर्वत रांगा, बारमाही वाहणाऱ्या नद्या, उत्तुंग जलप्रपात, समृद्ध वनसंपदा, विपुल खनीज संपत्ती, अनोखी जैवविविधता, सुपीक जमीन, गुगामल व ताडोबा अभयारण्य, मेळघाटची अत्युच्च परिसंस्था (इकोसिस्टम), मोहित करणारी पर्यटन स्थळे, अनोखी आदीम सभ्यता येथील बलस्थाने आहेत. त्यामुळे विदर्भाला कधीकाळी "वऱ्हाड आणि सोन्याची कुऱ्हाड" अशी ख्याती प्राप्त झाली होती. मग आज विदर्भ असा बकाल का झाला असेल ? हा प्रश्न प्रत्येक सुजान, सुसंकृत आणि जागरूक विदर्भप्रेमीच्या मनात येणे स्वभाविक आहे. कारण आजच्या विदर्भाची ओळख म्हणजे शेतकरी आत्महत्या, कुपोषण, गर्भार माता मृत्यू, भयानलेला आदिवासी बांधव, रखडलेले सिंचन प्रकल्प, लोप पावलेला औद्योगिक विकास, बोकाळलेला भ्रष्टाचार, प्रदूषण, बेरोजगारी, नक्षलवाद, वाढती व्यसनाधिनता, बालगुन्हेगारी, तरुणांचे मुंबई पुण्याकडे होणारे स्थलांतरण, कमी झालेले चार आमदार आणि एक खासदार, डबघाईस आलेली शिक्षण व आरोग्य व्यवस्था आणि महत्वाचे म्हणजे सत्तांध राजकीय नेत्यांचा आश्रय मिळालेली माफियागिरी, यामुळे येथील जनजीवन निराशेच्या सात दशकांपासून भोवऱ्यात गरगरत आहे.

"राजा ते रंक" अशी विदर्भ प्रदेशाची अधोगती कशी झाली ? याबाबत अर्धा ते पाऊण शतक मागे जाऊन आढावा घेतला तर सर्व काही आपल्या लक्षात येईल. विदर्भ प्रदेश हा देशातील एक शिलकी महसुलीचा प्रदेश म्हणून ख्यातकीर्त होता. सर्वप्रकारचे सुख पायाशी लोळण घेत असल्याने, येथील जनता सुखी, समाधानी आणि अल्पसंतुष्ट असणे क्रमप्राप्त होते. विदर्भाच्या समृद्धीवर भिकार मनोवृत्तीचा डोळा असणे यात तसे काही वावगे नाही. स्वकर्तृत्व विसरलेला याचक नेहमी दात्याकडून कधी आयता तुकडा मिळेल याची वाट लोचटपणे पाहत असतो. अशाप्रकारच्या याचक प्रवृत्तींनी, अगोदर विदर्भातील दातृत्वाशी भावनीक जवळीक साधली आणि काही दशकातच त्याला लुटून त्यावर मालकी स्थापीत केली. या षडयंत्राची सुरुवात जेंव्हा विदर्भ "सेंट्रल प्रोविन्स अँड बेरार" म्हणून मध्य प्रांतासोबत होता, तेव्हापासून झाली होती. त्यावेळी नागपूरला राजधानीचा मान होता. मुगल, निजाम, भोसले, इंग्रज राजवट येथील नैसर्गीक संसाधने आणि साधन संपत्तीतून लगतच्या प्रदेशांची भरभराट करायचे. अशा गरजू प्रदेशांचा विदर्भाप्रती नेहमीच कृतज्ञभाव असायचा. त्यामुळे विदर्भाच्या दातृत्वाने कधीच आवरता हात घेतला नाही. त्याचा "देण्याचा निरपेक्ष आनंद" कधी ओसरला पण नाही.

वैदर्भीय जनतेचे औदार्य आणि संवेदनशील वृत्ती हेरून, पश्चिम महाराष्ट्र व तत्कालीन बॉम्बे प्रांतातील काही छद्मी नेत्यांनी विदर्भाला लुटण्याचे एक सुनियोजीत षडयंत्र रचले. प्रथम त्यांनी विदर्भातील जनता "मराठी भाषिक" आहे, म्हणून जवळीक साधली. मध्य प्रांतातील हिंदी भाषिक लोकं विदर्भाचे शोषण करतात, तुम्हाला ते कधीच पुढे जाऊ देणार नाही, असा दूजाभाव निर्माण केला. आपण सर्व मराठी भाषिक एकत्र आलो तर आपलेच राज्य असणार आणि त्या राज्यात तुमचेच वर्चस्व राहणार, असा लबाडीचा सूर आवळला. खरं तर मध्य प्रांतातील हिंदी भाषिक जनता विदर्भाबाबत कधीच कृतघ्न नव्हती आणि आज पण नाही. देश स्वातंत्र्य संग्रामाच्या अंतीम टप्प्यात असताना, पश्चिम महाराष्ट्र व तत्कालीन बॉम्बे प्रांतातील नेत्यांनी, संयुक्त महाराष्ट्र चळवळ जन्माला घातली. प्रथम त्यांनी विदर्भातील काही नेत्यांची दिशाभूल करून प्रथम ८ ऑगस्ट १९४७ रोजी "अकोला करार" केला. नंतर २८ सप्टेंबर १९५३ रोजी "नागपूर करार" केला. अकोला कराराच्यावेळी विदर्भाची लोकसंख्या उर्वरित मराठी प्रदेशाच्या तुलनेत २३ टक्के होती. याच्या आधारावर विदर्भाला विकासाच्या सर्व क्षेत्रात समान संधी मिळेल, असे नकली आश्वासन दिले. पुढे १९५६ ते १९६० पर्यंत विदर्भाला द्विभाषिक बॉम्बे राज्यात ओढले. दरम्यान संयुक्त महाराष्ट्राचे गाजर पुढे करून विदर्भातील मराठी भाषिक नेत्यांना मोहात पाडले. अनेक नेत्यांना सत्तेचे प्रलोभन देऊन त्यांच्यावर गारूड केले. परिणामी १ मे १९६० रोजी विदर्भाला संयुक्त महाराष्ट्राच्या दावणीला बांधून, त्याला पुरते गुलाम करून टाकले. आणि नागपूर कराराप्रमाणे राज्यातील एकूण महसुलाच्या २३ टक्के वाट्याची वादाखिलाफी राजरोसपणे सुरू केली. विदर्भातील अनुशेषाचा भस्मासूर दिवसागणिक वाढत गेला. काही राजकीय पक्षांनी अखंड महाराष्ट्राचे ढोल बडवत विदर्भाच्या तरुणांना, विदर्भ राज्य विरोधी मंत्र दिला. ते सर्व जणू जालियनवाला हत्याकांडातील जनरल डायरचे काळे इंग्रज बनून विदर्भातील जनतेच्या जीवावर उठले. सत्ताधांनी विपक्षात असताना,सत्ता मिळविण्यासाठी स्वतंत्र विदर्भ राज्य आंदोलनाचा धूर्तपणे उपयोग केला. मात्र सत्तेवर आरूढ होताक्षणीच विदर्भाच्या तोंडाला त्यांनी पाने पुसली. कित्येक विदर्भवादी नेत्यांना सत्तेत खेचून त्यांच्या हातून स्वतंत्र विदर्भ राज्याच्या पाठीत खंजीर खुपसला. विदर्भातील जनतेला अशा नौटंकी करणाऱ्या नेत्यांची खरी ओळख जेंव्हा झाली, तेंव्हा मात्र उशीर झाला होता. विदर्भाच्या जीवावर गब्बर झालेले नेते आता येथील जनतेलाच धमक्या देऊ लागले आहेत.

या विपरीत परिस्थितीत सुद्धा स्वतंत्र विदर्भ राज्य आंदोलन चळवळीची धग अजूनही जिवंत आहे. "विदर्भ जाणून घेऊ या" अभियानातून विदर्भाच्या सर्व जिल्ह्यात विदर्भप्रेमींचा जनजागर सुरू आहे. महाराष्ट्रात सामील झाल्यानंतर, कधीकाळी वैभवशाली प्रदेश म्हणून मिरविणाऱ्या विदर्भाचे आजचे विदारक वास्तव, प्रचंड वेदनादायी आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि मुंबईतील नेत्यांनी विदर्भातील संधीसाधू नेतृत्वाला सत्तेचा विळखा घालून, येथील कोळसा, वीज, खनीज, शेतमाल, वनसंपदेची बेमालूम लूट चालविली आहे. विदर्भातील शेतकरी दररोज आत्महत्या करीत आहेत. उच्चशिक्षित तरुण रोजगाराच्या शोधात पुणे, मुंबईकडे धाव घेत आहेत. या स्थलांतराने कुटुंब उध्वस्त होत असून विदर्भ एक वृद्धाश्रम होण्याचा मार्गावर अग्रेसर आहे.

या सर्व वेदनादायी भिकार वास्तवातून मुक्ती मिळावी म्हणून विदर्भप्रेमींची संघर्ष यात्रा अविरत सुरू आहे. १ मे रोजी संयुक्तं महाराष्ट्राची निर्मिती करून विदर्भाला कायमचे वेठबिगार करून टाकले, याच्या निषेधार्थ विदर्भप्रेमी महाराष्ट्र दिन काळा दिवस म्हणून पाळतात. अर्थात यामध्ये महाराष्ट्राचे कुठलेच अहित नसून केवळ विदर्भाची मुक्ती व्हावी, येथील जनतेला गत वैभव आणि सन्मान प्राप्त व्हावा, हा एकच प्रामाणिक हेतु आहे.

अर्थात या पेक्षा दुसरे कारण पण काय असू शकेल?

---

## नाशिक जिल्हा फेन्सिंग संघ जाहीर; राज्यस्तरीय स्पर्धेसाठी सज्ज

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी /राहुल कुलकर्णी**

नाशिक डिस्ट्रिक्ट फेन्सिंग असोसिएशनच्या वतीने १७ वर्षांखालील मुलं व मुलींसाठी आयोजित करण्यात आलेल्या निवड चाचणीच्या आधारे राज्यस्तरीय स्पर्धेसाठी नाशिक जिल्ह्याचा संघ जाहीर करण्यात आला आहे. ही निवड चाचणी दि. २५ एप्रिल रोजी कालिका मंदिर हॉल, जुना आग्रा रोड, मुंबई नाका येथे पार पडली.

निवड चाचणीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना पुढील तयारीसाठी विशेष प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तसेच महाराष्ट्र क्रीडा मार्गदर्शक अजिंक्य दुधारे, जय शर्मा, आनंद चकोर, राहुल फडोळ आणि प्रसाद परदेशी यांनी मार्गदर्शन केले.

जिल्हा संघटनेचे अध्यक्ष दत्ता पाटील आणि छत्रपती पुरस्कार विजेते अशोक दुधारे सर यांनी निवडलेल्या खेळाडूंची अधिकृत घोषणा केली. हा संघ छत्रपती संभाजीनगर येथे दि. ३० एप्रिल ते २ मे २०२६ दरम्यान होणाऱ्या राज्यस्तरीय फेन्सिंग स्पर्धेत सहभागी होणार आहे.

**संघाची यादी पुढीलप्रमाणे:**

ईपी (Epee) प्रकार – मुलं:

विरल मस्के, आदित्य बांगर, अंकुश पाटील, विराज केंद्रे



फॉइल (Foil) प्रकार – मुलं:

विराज केंद्रे, सत्यजित खैरनार, आदित्यराज पवार, विरल मस्के

सेबर (Sabre) प्रकार – मुलं:

सोहम हेकरे, सार्व भट्टा, गौरव शिंदे, साई शिंदे

फॉइल (Foil) प्रकार – मुली:

मूर्खना संचे, लगदी मोदी, तेजस्विनी राणे, नेहा पाटील

ईपी (Epee) प्रकार – मुली:

अस्मी धामणे, रिधिमा जोगोटीया, रिद्धी दवे, श्रकवी शेटकर

सेबर (Sabre) प्रकार – मुली:

अनखा माळी, माहीम शेख, स्पर्श बत्तीसी, रिद्धी दवे या प्रसंगी कालिका मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष अण्णा पाटील, जिल्हा संघटनेचे पदाधिकारी दीपक निकम, राजू शिंदे तसेच नितीन सुगंधी आदी मान्यवर उपस्थित होते.निवडलेल्या खेळाडूंना उत्तम प्रशिक्षण आणि मार्गदर्शन मिळाल्याने राज्यस्तरीय स्पर्धेत नाशिक जिल्ह्याचा संघ उल्लेखनीय कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

---

## रेवदंडा परिसरात बेफिकीर वाहनचालकाच्या निष्काळजीमुळे ज्येष्ठ शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू; कायदेशीर कारवाई सुरू, बेफिकीर चालकांना इशारा

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : रेवदंडा पोलिस स्टेशन हद्दीत बेफिकीर आणि अतिवेगाने वाहन चालवणाऱ्या निष्काळजी वाहनचालकामुळे झालेल्या भीषण अपघातात एका ६३ वर्षीय ज्येष्ठ शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना परिसरातील रहिवाशांमध्ये प्रचंड संताप आणि हळहळ निर्माण करणारी आहे. रस्त्यावर नियमांचा उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांना आता कठोर धडा शिकवण्याची वेळ आली आहे, अन्यथा अशा दुर्दैवी अपघातांची संख्या वाढतच राहील.

रेवदंडा पोलीस ठाण्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, मधुकर हरिभाऊ पाटील (वय ६३, रा. मिठेखार, ता. मुरुड) हे २८ एप्रिल २०२६ रोजी रात्री आपल्या हीरो सुपर स्प्लेंडर (MH-06-AY-4049) दुचाकीवरून चणेरा येथील करारानें घेतलेल्या आंब्याच्या बागेची पाहणी करून मिठेखारकडे परत येत होते. ते



कुटुंबातील मुख्य भरणकर्ते असून, शेती-बागायती हा त्यांचा प्रमुख व्यवसाय होता. दरम्यान, समोरून येणारा पवन रमेश चौधरी (रा. शिरगाव) हा बेफिकीर चालक होंडा शाईन (MH-06-CE-7587) दुचाकीवर तिघांना बसवून रॉंग साईडने आणि झपाट्याच्या वेगाने वाहन चालवत येत होता. निष्काळजीने वाहन चालवताना त्याने मधुकर पाटील यांच्या दुचाकीला समोरून जोरदार धडक दिली.

या भीषण धडकेत मधुकर पाटील गंभीर जखमी झाले. त्यांना तात्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. मधुकर पाटील हे शांत स्वभावाचे आणि मेहनती शेतकरी म्हणून परिसरात ओळखले जाणारे होते. त्यांच्या अकाली मृत्यूमुळे कुटुंब आणि शेजाऱ्यांवर शोककळा कोसळली आहे. परिसरातील नागरिकांनी या घटनेची कठोर नोंद घेतली असून, बेफिकीर वाहनचालकांविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली आहे.

या प्रकरणी मधुकर पाटील यांचा मुलगा प्रथमेश मधुकर पाटील यांनी रेवदंडा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. पोलीस उपनिरीक्षक दीपक जानू म्हशीलकर यांच्या नेतृत्वाखाली गुन्हा रजिस्टर क्रमांक ५६/२०२६ अंतर्गत BNS कलम १०६(१), २८१, १२५(अ), १२५(ब) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८६, १२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघातातील आरोपी पवन चौधरी देखील जखमी असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत. पोलीस तपास अधिक गतीने करत असून, आरोपीवर कडक कारवाई करण्यात येईल.

बेफिकीर चालकांना कान टोचणारा इशारा

रेवदंडा-मुरुड परिसरात दररोज रॉंग साईड, अतिवेग आणि ओव्हरलोडिंगमुळे असे अपघात घडत आहेत. अलीकडेच झालेल्या काही अपघातांमध्येही बेफिकीर चालकांचाच हात होता. पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, "रस्ता हा सर्वांचा आहे. नियमांचे पालन न करणाऱ्यांवर आता कडक कारवाई होईल. ज्येष्ठ नागरिक, महिला आणि मुलांसाठी सुरक्षित रस्ते निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारीने वाहन चालवावे," असे आवाहन केले आहे. परिसरातील रहिवासी संघटनेनेही "सुरक्षित वाहतूक अभियान" राबवण्याची घोषणा केली असून, बेफिकीर चालकांना आता कायदेशीर धडा शिकवण्याची वेळ आली आहे. अन्यथा, अशा दुर्घटना टाळता येतील का?

---

# अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे खाजगी विद्यापीठांमध्ये रूपांतर : बदलत्या शिक्षण व्यवस्थेचे चित्र

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : महाराष्ट्र शासनाने २८ एप्रिल २०२६ रोजी घेतलेला निर्णय अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे खाजगी विद्यापीठांमध्ये रूपांतर करण्यासाठी समिती गठीत करणे, हा केवळ प्रशासकीय औपचारिकता नसून राज्याच्या उच्च शिक्षण व्यवस्थेच्या मूलभूत स्वरूपात बदल घडवून आणणारा एक निर्णायक टप्पा आहे. 'अभ्यास समिती' हा शब्द वापरला गेला असला, तरी प्रत्यक्षात हा निर्णय भविष्यातील धोरणात्मक परिवर्तनाची नांदी ठरू शकतो. त्यामुळे या निर्णयाकडे केवळ प्रक्रियात्मक पातळीवर न पाहता, त्याच्या दीर्घकालीन सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक परिणामांच्या संदर्भात समजून घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील अनुदानित महाविद्यालयांची परंपरा ही केवळ शिक्षण देण्यापुरती मर्यादित नाही; ती सामाजिक न्याय, सर्वसमावेशकता आणि शिक्षणाचे लोकशाहीकरण यांचे प्रतीक आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि मागासवर्गीय समाजघटक यांच्यासाठी ही महाविद्यालये उच्च शिक्षणाची दारे उघडणारी ठरली आहेत. त्यामुळे अशा संस्थांचे खाजगी विद्यापीठांमध्ये रूपांतर करण्याचा विचार हा शिक्षणाच्या या सामाजिक ध्येयधोरणांवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे.या निर्णयामागे 'स्वायत्तता', 'गुणवत्ता' आणि 'जागतिक स्पर्धात्मकता' यांसारख्या आकर्षक संकल्पना पुढे केल्या जात आहेत. शासनाचा असा दावा आहे की अधिक स्वायत्तता मिळाल्यास शिक्षण संस्था अधिक प्रभावीपणे कार्य करू शकतील, संशोधनाला चालना मिळेल आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढेल. काही अंशी हा मुद्दा योग्य असला, तरी स्वायत्ततेचा अर्थ काय आणि ती कोणाच्या हितासाठी वापरली जाणार, हा मूलभूत प्रश्न येथे उपस्थित होतो.

स्वायत्ततेच्या नावाखाली संस्थांना शुल्क ठरवण्याचे अधिकार, अभ्यासक्रम रचनेवरील पूर्ण नियंत्रण आणि भरती प्रक्रियेतील स्वातंत्र्य दिल्यास, त्या अधिक लवचिक बनतील हे खरे; पण त्याचवेळी या अधिकारांचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्याच्या अनेक खाजगी विद्यापीठांचा अनुभव पाहता, उच्च शुल्क, मर्यादित पारदर्शकता आणि 'ब्रँडिंग'वर भर देण्याची प्रवृत्ती दिसून येते. त्यामुळे अनुदानित महाविद्यालयेही त्याच मार्गावर गेल्यास शिक्षणाच्या मूलभूत उद्दिष्टांवर परिणाम होण्याचा धोका आहे.

आर्थिकदृष्ट्या हा बदल अधिक गंभीर ठरू शकतो. सध्या अनुदानित महाविद्यालयांना शासनाकडून वेतन व इतर अनुदान मिळते, ज्यामुळे शिक्षणाचा खर्च नियंत्रित राहतो. परंतु खाजगी विद्यापीठांमध्ये रूपांतर झाल्यानंतर शासनाचे अनुदान कमी किंवा बंद होण्याची शक्यता आहे. परिणामी, संस्थांना स्वतःचे आर्थिक स्रोत निर्माण करावे लागतील आणि यासाठी शुल्कवाढ हा सोपा मार्ग निवडला जाईल. अशा परिस्थितीत शिक्षणाचा खर्च वाढेल आणि गरीब व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण अधिक कठीण होईल.

परिणामी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व बहुजन घटकांना उच्च शिक्षणाच्या संधींपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण होते. अशा धोरणात्मक बदलांचा सामाजिक न्यायाच्या दृष्टीने गंभीर परिणाम होऊ शकतो. शासनाच्या आतापर्यंतच्या अनुभवाचा विचार करता, अनेक खाजगी महाविद्यालयांमध्ये प्रभावी नियंत्रण यंत्रणेचा अभाव, स्पष्ट व सक्तीचा नियामक आराखडा (School/Institutional Code) नसणे, तसेच नियमित व पात्र अध्यापक-कर्मचारी यांची नियुक्ती न होणे, ही बाब प्रकर्षाने दिसून येते. याशिवाय, कर्मचाऱ्यांना नियमित वेतन न मिळणे ही देखील एक गंभीर समस्या आहे, जी शैक्षणिक गुणवत्तेवर थेट परिणाम करते.

अशा परिस्थितीत केवळ 'गुणवत्तापूर्ण शिक्षण' या संकल्पनेवर भाष्य करण्यापेक्षा, विद्यमान शैक्षणिक व्यवस्थेला संस्थात्मकदृष्ट्या अधिक सक्षम, उत्तरदायी आणि पारदर्शक कसे बनविता येईल, यावर शासनाने प्राधान्याने लक्ष केंद्रित करणे अपेक्षित आहे. त्यामुळे, या पार्श्वभूमीवर शासनाची भूमिका, नियामक हस्तक्षेपाची गरज आणि अंमलबजावणीची परिणामकारकता यांचा अभ्यास करणे हा एक महत्त्वाचा संशोधनाचा विषय म्हणून पुढे येत आहे.

` या प्रक्रियेचा सर्वात मोठा परिणाम शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर होण्याची शक्यता आहे. अनुदानित व्यवस्थेत त्यांना मिळणारी नोकरीची सुरक्षितता, शासनमान्य वेतनश्रेणी आणि निवृत्तीवेतन यामुळे एक प्रकारचे स्थैर्य मिळते. परंतु खाजगी विद्यापीठांमध्ये कराराधारित नियुक्त्या, वेतनातील अस्थिरता आणि सेवाशर्तींमधील बदल ही वास्तवता आहे. शासन निर्णयात कर्मचाऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याबाबत उल्लेख असला, तरी त्यासाठी ठोस आणि बंधनकारक हमी नसल्यास शिक्षकांच्या भवितव्याबाबत अनिश्चितता निर्माण होऊ शकते.

याचबरोबर शिक्षणाच्या व्यापारीकरणाचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. खाजगी विद्यापीठांची रचना अनेकदा नफा-केंद्रित असते. अशा परिस्थितीत शिक्षण हा 'हक्क' न राहता 'खरेदीयोग्य वस्तू' बनण्याचा धोका निर्माण होतो. गुणवत्तेपेक्षा उत्पन्नाला प्राधान्य दिले गेले, तर शिक्षणाचा सामाजिक उद्देश मागे पडू शकतो.

सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेही हा निर्णय चिंताजनक आहे. अनुदानित महाविद्यालयांमध्ये आरक्षण धोरणामुळे विविध घटकांना समान संधी मिळते. परंतु खाजगी क्षेत्रात आरक्षणाची अंमलबजावणी अनेकदा मर्यादित स्वरूपात दिसते. समितीच्या कार्यकक्षेत आरक्षणाबाबत मार्गदर्शक तत्त्वे सुचवण्याचा उल्लेख आहे, परंतु ती बंधनकारक नसल्यास शिक्षणातील समतेवर परिणाम होऊ शकतो.

प्रशासकीय नियंत्रणाच्या दृष्टीने पाहिले, तर सध्या विद्यापीठ आणि शासन यांच्या देखरेखीमुळे काही प्रमाणात उत्तरदायित्व टिकून आहे. परंतु खाजगी विद्यापीठांमध्ये स्वायत्तता वाढल्याने बाह्य नियंत्रण कमी होऊ शकते, ज्यामुळे पारदर्शकतेचा अभाव निर्माण होण्याची शक्यता आहे. प्रवेश प्रक्रिया, आर्थिक व्यवहार आणि भरती यामध्ये अपारदर्शकता वाढल्यास शिक्षण व्यवस्थेवरचा विश्वास कमी होऊ शकतो.

सार्वजनिक मालमत्तेचा प्रश्नही येथे महत्त्वाचा ठरतो. अनेक अनुदानित महाविद्यालयांना शासनाने जमीन आणि इतर सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. अशा मालमत्तेचा वापर खाजगी विद्यापीठांसाठी केला गेला, तर तो सार्वजनिक संसाधनांच्या खाजगीकरणाचा मुद्दा निर्माण करतो. यामध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व अत्यावश्यक ठरते.

शासन शिक्षण क्षेत्रातून आपली जबाबदारी कमी करत आहे का? अनुदान कमी करून खाजगीकरणाला चालना देणे म्हणजे सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेपासून माघार घेण्यासारखे आहे का? याचा अर्थ असा नाही की सुधारणा आवश्यक नाहीत. उलट, शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता वाढवण्यासाठी आणि संशोधनाला चालना देण्यासाठी सुधारणा आवश्यक आहेत.असे फक्त भासवण्याचा प्रयत्न शासन करतात का ? शासनाची भुमिका जबाबदारीपासून पळ काढण्याची तर नाही ना ? परंतु त्या सुधारणा खाजगीकरणाच्या मार्गानेच व्हाव्यात, असे नाही. अनुदानित महाविद्यालयांना अधिक शैक्षणिक स्वायत्तता देणे, संशोधनासाठी निधी वाढवणे, पायाभूत सुविधा सुधारणा करणे आणि शिक्षक प्रशिक्षणावर भर देणे,हे पर्याय अधिक संतुलित आणि परिणामकारक ठरू शकतात.

एकंदरीत हा शासन निर्णय आज 'अभ्यास समिती' या स्वरूपात असला, तरी उद्या तो शिक्षण व्यवस्थेच्या व्यापक रूपांतरणाचा पाया ठरू शकतो. त्यामुळे या प्रक्रियेकडे अत्यंत सजगतेने आणि जबाबदारीने पाहणे आवश्यक आहे. जर योग्य संरक्षणात्मक उपाययोजना केल्या नाहीत, तर शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी या तिन्ही स्तरांवर असंतोष वाढण्याची शक्यता आहे. शिक्षणातील विषमता तीव्र होऊ शकते आणि शिक्षणाचे व्यापारीकरण वाढू शकते.

शेवटी, हा प्रश्न केवळ धोरणाचा नाही, तर शिक्षणाच्या मूलभूत स्वरूपाचा आहे. शिक्षण हे समाजासाठीचे साधन राहणार की बाजारपेठेतील एक उत्पादन बनणार? याचे उत्तरच महाराष्ट्राच्या शिक्षण व्यवस्थेची दिशा आणि भवितव्य निश्चित करणार आहे.

या व्यवस्थेत भविष्यात कमी पगारावर शिक्षक नेमून त्यांना जास्त भार दिला जाईल त्यामुळे शिक्षणाचा दर्जा खाली जाईल पण फक्त विद्यार्थ्यांचे मार्क वाढवणे हे शिक्षक सहज करू शकतात. ही चलाखी फार काळ चालणार नाही त्याचे परिणाम विद्यार्थ्यांना नोकरीत अडचणी निर्माण करणारे ठरतील. शिक्षणाचा मुख्य उद्देश विद्यार्थी आणि अप्रत्यक्षरित्या भविष्यातील देश घडवणे असतो तो बदलुन शिक्षण म्हणजे व्यापार त्यातून मिळवायचा नफा असा उद्देश त्या कॉलेजचा सीमित होईल. अशी दाट शक्यता आहे.



**डॉ. प्रशांत विघे**
**राजकीय विश्लेषक तथा सिनेट सदस्य,**
**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती**

# भूमी अभिलेख विभागाच्या जमीन ।मोजणी फेरफारसह अन्य सुविधा ऑनलाइन-'उपसंचालक डॉ लालसिंग मिसाळ

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राकेश यादव वाडी**

**नागपूर** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिरामुळे मोजणी अर्ज, फेरफार यासह अनेक कामे आता ऑनलाइन पद्धतीने होत असल्याने नागरिकांची मोठी सोय झाली आहे. या अंतर्गत भूमिअभिलेख विभागातर्फे नागरिकांना विविध सेवा देण्यात येत आहेत. अशी माहिती भूमी अभिलेख उपसंचालक डॉ लालसिंग मिसाळ यांनी दिली.

विभागाच्या योजनाचा जलद व सुलभपणे लाभ घेण्यासाठी विभागाने क्यूआर कोड तसेच वेबसाइट तयार केली आहे, नागरिकांनी योजनाचा लाभ घेण्यासाठी क्यू आर कोडचा वापर करावा असे डॉ मिसाळ यांनी सांगितले .

मोजणी अर्ज करणे व त्याची सद्यस्थिती जाणून घेणे त्यामुळे शक्य झाले आहे. यासाठी ई मोजणी आज्ञावलीचा वापर करून ऑनलाइन अर्ज करावा. त्यामुळे घरबससल्या मोजणी करता येते तसेच मोजणी प्रकरणाची स्थिती काय ते माहिति होते. यावर जीआयएस आधारित अक्षांश रेखाशांसह मोजणी नकाशा मिळणार आहे. या सुविधसेसाठी https:\\emojni2.mahabhumi.gov.in ही वेबसाइट आहे.

एकत्रित कुटुंब व पोटहिस्सा मोजणीसाठी https:\\emojni2.mahabhumi.gov.in ही वेबसाइट आहे. यात एकत्र कुटुंबाचे धारण जमिनीचे नोंदणीकृत वाटणीपत्र आधारे विभाजन, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ८५ अन्वये विभाजन, संमतीने पोट हिस्सा – नोंदणीकृत वाटप- दिवाणी आदेशान्वये वाटप नुसार पोटहिस्सा मोजणी करता येईल. त्यासाठी २०० रु. प्रति पोटहिस्सा मोजणी शुल्क भरावे लागेल.

त्याचप्रमाणे मिळकत पत्रिकेवरील फेरफारसाठी ऑनलाइन अर्ज करता येणार अहे. १) वारस नोंद, २) खरेदी नोंद, मृत्युपत्र- इच्छापत्र नोंद, गहानखत नोंद, भाडेपट्टा नोंद, हक्कसोड पत्र- रिलिज डीड नोंद, बक्षीसपत्र नोंद, एकत्र कुटुंब नोंद कमी करणे आदी फेरफार प्रकार करता येतील. यासाठी https:\\epsit2.mahabhumi.gov.in ही वेबसाइट आहे.

**आपली चावडी**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाचे एक अधिकृत वेब पोटर्ल आहे. चालू सातबारा फेरफार, मालमत्ता पत्रक फेरफार, मोजणी नोटीस, स्वामित्व नोटीस, पीक पाहणी माहिती यांची सद्यस्थिती आपली चावडीवर पाहता येईल. आपली चावडीवरील नोटीस पाहण्यासाठी https:\\digitalsatbara.mahabhumi.gov.in या वेबसाइटचा वापर करावा.

राज्यातील गावठाणांचे नगर भूमापन झालेले आहे. त्यांचे नकाशे, चौकशी नोंदवही, तसेच स्वामित्व योजनेंतर्गत तयार झालेले मिळकत पत्रिका शुल्क भरून ऑनलाइन डाऊलनलोड करण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यासाठी https:\\ mahabhumi.gov.in या वेबसाइटचा उपयोग करावा,

पोटहिस्सा पथदर्शी प्रकल्प

या प्रकल्पाची उद्दिष्टे—राज्यातील सर्व्हे नंबर, गट नंबरमध्ये तयार झालेल्या पोटहिस्स्यांची मोजणी करणे, अधिकार अभिलेख सात बारा व नकाशा अद्ययावत करणे, प्रत्येक भू भागास भू- आधार क्रमांक देणे.

फायदे- सातबारानुसार धारकनिहाय स्वतंत्र पोटहिस्सा, भूभाग नकाशे उपलब्ध होतील, धारकांचे क्षेत्र व हद्दीविषयी वाद कमी होण्यास मदत होईल, अधिकारी अभिलेख सात- बारा व त्यांचे नकाशे तंतोतंत मेळात ठेवणे शक्य होईल, भूभाग नकाशे व अधिकार अभिलेख यांचे संलग्नीकरण करता येईल, शेतकरी, विविध बँका व पीक विमा कंपन्यांना नुकसान भरपाई निश्चित करण्यासाठी अद्ययावत तपशील उपलब्ध होईल. खरेदीपूर्वी मोजणी प्रक्रियेची कार्यवाही करण्यासाठी अचूक डिजिटल डाटाबेस तयार होईल.

**भू नकाशा**

आपल्या गावातील नकाशा तसेच धारकांची नकाशाची सद्यस्थिती माहिति करणे व डाऊनलोड करणे ही कामे https:\\mahabhumi.gov.in या बेवसाइटवर करता येतील.

भूमी अभिलेख नक्कल

एकत्रीकरण, बंदोबस्त नकाशा, टिपण बूक, गुणाकार बूक, फाळणी नकाशा, आकारबंद बुक, आकार फोड पत्रक यांच्या भूमी अभिलेख विभागाकडील नकला ऑनलाइन काढण्यासाठी https:\\digitalsatbara.mahabhumi.gov.in या वेबसाइटचा वापर करता येईल.

**न्यायालयीन प्रक्रिया**

संबंधित न्यायालयीन प्रक्रिया डिजिटल माध्यमातून चालविण्यासाठी e-QJ court (PRATYAY) ही आज्ञावली विकसित करण्यात आली आहे. त्यामुळे ऑनलाइन केस फाइल करणे, ऑनलाइन सुनावणी नोटीस, प्रकरणाची सद्यस्थिती तपासणे, ऑर्डर, निकाल डाऊननलोड करणे अशा सुविधा ऑनलाइन उपलब्ध झाल्या आहेत.

**"४५ दिवस थांबूनही गॅस बुकिंग केल्यानंतर १५-२० दिवस टाकी मिळत नाही. घरात एकच टाकी असल्याने उपासमारीची वेळ येते. हॉटेलांना मात्र लगेच टाक्या मिळतात, हा अन्याय आहे."**

**-प्रकाश गुंजाळ ग्रामस्थ**

**"अगोदर आम्हाला दररोज सुमारे १०० गॅस टाक्या मिळत होत्या. मात्र सध्या केवळ ३० टाक्याच मिळत असल्याने मोठी अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे ग्राहकांना वेळेवर टाक्या देणे शक्य होत नाही."**

**एचपी गॅस एजन्सी, विंचूर**

**गॅस टाक्या वेळेवर उपलब्ध होत नाहीत. गाडी उशिरा येत असल्याने वितरणात अडचणी येत आहेत, त्यामुळे ग्राहकांना त्रास सहन करावा लागत आहे."***

**भारत गॅस एजन्सी, विंचूर**

## श्रीकृष्ण नृत्यालयम तर्फे अरंगेत्रम कार्यक्रम 2 मे रोजी साई सभागृहात

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** प्रमीला उन्नीकृष्णन यांच्या मार्गदर्शनात प्रसिद्ध शास्त्रीय नृत्य संस्था, श्रीकृष्ण नृत्यालयम ची शिष्या सुजाता सिंग हिचा अरंगेत्रम २ मे रोजी सायंकाळी ६:३० वाजता. वॉकहार्ट हॉस्पिटल मागे साई सभागृहात सादर करणार आहे अशी माहिती पत्रकार परिषदेत दिली. गेल्या १४ वर्षांपासून भरतनाट्यमची समर्पित विद्यार्थिनी असलेल्या सुजाता सिंगने, कोलकाता येथील हिंदुस्तान आर्ट अँड म्युझिक सोसायटी आणि मुंबई येथील गंधर्व विद्यापीठासारख्या नामांकित संस्थांमधून आपल्या विशारद परीक्षा पूर्ण केल्या आहेत. आपल्या कलात्मक प्रवासासोबतच, तिने तितक्याच उत्कृष्टतेने शैक्षणिक क्षेत्रातही प्रगती केली असून नागपूरातील जी.एच.रायसोनी इन्स्टिट्यूट मधून बीसीए आणि एमसीए पूर्ण केले आहे. तिने चिदंबरम नाट्यंजली (२०२४), गुरुवायूर मंदिर (२०२३)




यांसारख्या प्रतिष्ठित मंचांवर आपली कला सादर केली असून, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय महोत्सव व स्पर्धांमध्येही आपले कौशल्य दाखवले आहे. तिचे गुरू, श्रीमती प्रमिला उन्नीकृष्णन २७ वर्षांहून अधिक अध्यापनाचा अनुभव असलेल्या प्रमीला उन्नीकृष्णन या एक प्रतिष्ठित कलाकार असून नेहमिच त्या मार्गदर्शक शक्ती राहिल्या आहेत. अरंगेत्रम हा समर्पण, शिस्त आणि भरतनाट्यमच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा एक उत्सव ठरेल, अशी अपेक्षा आहे. परिषदेतील सुजाता सिंग, निभा सिंग, अंकिता सिंग, विवेक मिश्रा आणि प्रमिला उन्नीकृष्णन उपस्थित होत्या.

## श्री शिवाजी विद्यालय रिसोड येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**रिसोड (प्रतिनिधी)/रणजितसिह. ठाकूर** : स्थानिक श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे आज, ३० एप्रिल २०२६ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाद्वारे राष्ट्रसंतांच्या विचारांना उजाळा देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संजय देशमुख हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य संजय नरवाडे, पर्यवेक्षक गजानन भिसडे, ज्येष्ठ प्राध्यापक अरुण लिमजे, ज्येष्ठ शिक्षिका शोभा राऊत आणि शिक्षक प्रतिनिधी खुशाल राठोड यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थित शिक्षक व विद्यार्थ्यांनी राष्ट्रसंतांना अभिवादन केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य संजय देशमुख यांनी राष्ट्रसंतांच्या कार्यावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, "तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून समाजसुधारणेचा जो मंत्र दिला, तो आजही तितकाच प्रासंगिक आहे. त्यांच्या विचारांचे आचरण करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल."

या कार्यक्रमाला कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रसंतांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.विजय देशमुख यांनी केले.

## मेडशी बायपासवर मृत्यूचा थरार! भरधाव कारची भीषण धडक; हळद काढणीस जाणाऱ्या १० महिला गंभीर जखमी

### उभ्या मालवाहू वाहनावर जोरदार धडक; कार उलटली, परिसरात एकच खळबळ

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** वाशिम-अकोला महामार्गावरील मेडशी बायपास परिसरात आज सकाळी झालेल्या भीषण अपघाताने संपूर्ण परिसर हादरून गेला. भरधाव वेगाने येणाऱ्या टाटा हॅरियर कारने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या मालवाहू वाहनाला पाठीमागून जबर धडक दिल्याने हळद काढणीच्या कामासाठी निघालेल्या १० महिला मजुरांना गंभीर दुखापत झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळी सुमारे ७ वाजताच्या सुमारास मेडशी येथील काही महिला मजूर रिधोरा येथे हळद काढणीच्या कामासाठी जाण्यासाठी 'मॅक्झिमो'



(MH-08-AG-0967) या वाहनात बसून होत्या. संबंधित वाहन रस्त्याच्या कडेला उभे असतानाच वाशिमकडून अकोल्याच्या दिशेने अतिवेगाने येणाऱ्या टाटा हॅरियर (GJ-19-BJ-2000) कारने त्याला पाठीमागून जोरदार धडक दिली.

धडक इतकी भीषण होती की कार जागीच उलटली, तर उभ्या वाहनाचा मोठा चक्काचूर झाला. या अपघातात वाहनात बसलेल्या १० महिला गंभीर जखमी झाल्या. घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले.

जखमी महिलांना तातडीने रुग्णवाहिकेद्वारे वाशिम व अकोला येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले. सर्व जखमी महिला मेडशी येथील रहिवासी असून, आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी मजुरीच्या कामावर जात असताना हा दुर्दैवी अपघात घडल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

या घटनेमुळे महामार्गावरील वाहतुकीत काही काळ अडथळा निर्माण झाला होता. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

दरम्यान, या भीषण अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, अतिवेग आणि निष्काळजी वाहनचालना पुन्हा एकदा जीवघेणी ठरत असल्याचे अधोरेखित झाले आहे.

## राष्ट्रीय कर्तव्य म्हणून "स्वगणनेत" सहभागी व्हावे; चार्ज ऑफिसर सौ. सुरेखा स्वामी मॅडम यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी गिरमाजी सूर्यकार** : धर्माबाद येथे आज दि. 30 एप्रिल 2026 रोजी मा. तहसीलदार सुरेखा स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली जनगणना 2027 संदर्भात महत्त्वपूर्ण मार्गदर्शन बैठक पार पडली. या बैठकीस आपले सरकार सेवा केंद्र चालक, रोजगार सेवक, पोलीस पाटील, बचत गटांच्या महिला तसेच विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीत जनगणना प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. स्वतंत्र भारतातील ही आठवी जनगणना असून आतापर्यंत देशात एकूण 26 जनगणना झालेल्या आहेत, असे स्पष्ट करण्यात आले. प्रत्येक नागरिकाने हे राष्ट्रीय कर्तव्य समजून जनगणनेत सक्रिय सहभाग नोंदवणे अत्यावश्यक असल्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी पहिल्यांदाच डिजिटल पद्धतीने जनगणना प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. पहिला टप्पा म्हणून दि. 1 मे ते 15 मे 2026 या कालावधीत "स्वगणना" प्रक्रिया पार पडणार असून नागरिकांना



स्वतःच्या कुटुंबाची माहिती ऑनलाइन पद्धतीने भरता येणार आहे. यासाठी अधिकृत संकेतस्थळ लवकरच सुरू होणार असून त्याचा वापर कसा करावा याबाबत तांत्रिक सहाय्यक साहेबराव कदम यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

स्वगणना प्रक्रियेनंतर दुसऱ्या टप्प्यात दि. 16 मे पासून प्रगणकांमार्फत घरगणना सुरू होणार आहे. पुढील मुख्य जनगणना टप्पा 1 फेब्रुवारी 2027 पासून सुरू होणार असल्याची माहितीही देण्यात आली. पोर्टलवर माहिती भरताना एकूण 33 प्रश्न विचारले जाणार असून त्यामध्ये कुटुंबाची माहिती तसेच भौतिक सुविधांशी संबंधित मुद्द्यांचा समावेश असेल.

धर्माबाद तालुक्यात शहर भागासाठी मुख्य अधिकारी हे चार्ज ऑफिसर म्हणून कार्यरत राहणार असून ग्रामीण भागासाठी तहसीलदार हे चार्ज ऑफिसर म्हणून जबाबदारी पार पाडणार आहेत. स्वगणना ही नागरिकांनी आपल्या प्रत्यक्ष वास्तव्यातील ठिकाणीच करणे आवश्यक आहे. तसेच एकाच घरात स्वतंत्र कुटुंब असले तरी चूल एकत्र असल्यास एकत्रित गणना करावी लागणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. या बैठकीस आरशद सर, विसपुते सर, संगणक परिचालक, पोलीस पाटील, बचत गटांच्या महिला, रोजगार सेवक आदी उपस्थित होते. भारत सरकारतर्फे राबविण्यात येणाऱ्या जनगणना 2027 च्या पहिल्या टप्प्यात 1 मे ते 15 मे 2026 या कालावधीत स्वगणना प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. नागरिकांना https://se.census.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर आपली माहिती ऑनलाइन भरता येणार आहे. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी स्वगणना करून या राष्ट्रीय उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## शिवसेना प्रणित राष्ट्रीय शिव स्वराज्य सेना व वर्ल्ड वाईड ह्यूमनराइट्स ए.एफ या संघटनेतर्फे भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक, निर्माते,दिग्दर्शक दादासाहेब फाळके यांची जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर )** : शिवसेना प्रणित राष्ट्रीय शिव स्वराज्य सेना व वर्ल्ड वाईड ह्यूमनराइट्स ए.एफ या संघटनेच्या वतीने भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक, निर्माते,दिग्दर्शक धुंडिराज गोविंद फाळके उर्फ दादासाहेब फाळके यांची जयंती त्यांच्या दादर येथील अर्धपुतळयास पुष्पहार अर्पण



करून संघटनेच्या वतीने साजरी करण्यात आली.याप्रसंगी शिवसेना प्रणित राष्ट्रीय शिव स्वराज्य सेना अध्यक्ष व वर्ल्ड वाईड ह्यूमनराइट्स ए.एफ. चे राष्ट्रीय अध्यक्ष जितेंद्र दगडूदादा सकपाळ, WHRAF चे महाराष्ट्र अध्यक्ष मोहन वायदंडे,शिव स्वराज्य सेनेच्या प्रवक्त्या सौ.सुषमा सकपाळ राऊत,भारतीय केबल सेनेचे सचिव राजेश जैन,कमला मेहता दादर अंध विद्यालय च्या संचालिका श्रीमती वर्षा जाधव,वैद्यकीय मदत कक्षाचे अनिकेत लाड,स्वाद केटरर्स चे प्रोपरायटर नितीन कोलगे, लायन दिलीप वरेकर,लायन संजय सासमल,लायन सचिन राऊत,कमला मेहता दादर अंध विद्यालय च्या प्राचार्य श्रीमती तन्वी महाडदळकर,शिक्षिका श्रीमती सुरेखा जाधव व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# पाणीटंचाईचा प्रश्न समजून घेण्यासाठी धाडसी पाऊल

## युवा पत्रकार प्रतीक्षा गजभिये यांचा प्रामाणिक प्रयत्न

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे /तालुका प्रतिनिधी दर्यापूर** : लेहेगाव (रेल्वे) ता. दर्यापूर येथे गेल्या महिनाभरापासून तीव्र पाणीटंचाई जाणवत असून, नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्याने दैनंदिन जीवनावर मोठा परिणाम होत आहे. वाढत्या उन्हामुळे तापमान ४५ ते ४६ अंशांपर्यंत पोहोचल्याने नागरिकांसह जनावरांनाही पाण्याची टंचाई भासत आहे.

सध्या गावात एकच पाण्याची टाकी कार्यरत असून, उन्हाळ्यात वाढलेल्या मागणीमुळे संपूर्ण गावाला पुरवठा करणे कठीण झाले आहे. नवीन पाण्याच्या टाकीचे बांधकाम पूर्ण झाले असून तिचे उद्घाटन तातडीने करावे, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

दरम्यान, वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी पत्रकार प्रतीक्षा गजभिये यांनी टाकीची प्रत्यक्ष पाहणी केली. नागरिकांच्या शंकांना उत्तर मिळवण्यासाठी त्यांनी टाकीवर चढून पाण्याची पातळी तपासली. टाकीत पाण्याचे प्रमाण असल्याचे दिसून आल्याने पाणीटंचाईमागील कारणांचा शोध घेणे आवश्यक असल्याचे स्पष्ट झाले.

टाकीवर चढल्यानंतर काही काळ वाऱ्याचा वेग अधिक असल्याने खाली उतरण्यास विलंब झाला. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये चिंता निर्माण झाली



होती. मात्र, काही वेळानंतर त्या सुरक्षितपणे खाली उतरल्या.ही कृती कोणताही स्टंट नसून, नागरिकांच्या समस्येचा प्रत्यक्ष आढावा घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. "पत्रकारितेचा उद्देश केवळ बातमी देणे नसून, समस्यांचा मूळ शोध घेऊन त्यावर उपाययोजना व्हावी यासाठी प्रयत्न करणे हा आहे," असे त्या म्हणाल्या.या घटनेमुळे पाणीपुरवठा व्यवस्थेकडे प्रशासनाचे लक्ष वेधले जाण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या उपस्थितीत भव्य दंत शिबिर; नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम शहरात समाजहिताचा उत्कृष्ट आदर्श उभा करत नॅशनलिस्ट कंज्यूमर प्रोटेक्शन ऑर्गनायझेशन व श्री दिगंबर जैन महासमिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित निःशुल्क दंत तपासणी व एक्स-रे शिबिराचा भव्य शुभारंभ जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सिव्हिल लाईन चौकातील लक्ष्मी डेंटल क्लिनिक येथे आयोजित या उपक्रमाला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला.

प्राचार्य प्रशांत गडेकर यांच्या ४५ व्या वाढदिवसानिमित्त नॅशनलिस्ट कंज्यूमर प्रोटेक्शन ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाने सामाजिक बांधिलकीचे प्रभावी दर्शन घडवले. शिबिरामध्ये अत्याधुनिक पद्धतीने दंत तपासणी, एक्स-रे सुविधा तसेच गरजू रुग्णांना निःशुल्क औषधांचे वितरण करण्यात आले. शहरासह ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने महिला, पुरुष व ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग नोंदवून या सेवेचा लाभ घेतला.

उद्घाटनावेळी जिल्हाधिकारी योगेश



कुंभेजकर यांचे पारंपरिक पद्धतीने तिलक, शाल, श्रीफळ व मोत्याची माळ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी स्वतः दंत तपासणी करून शिबिराच्या नियोजनाची पाहणी केली व आयोजकांचे कौतुक केले. "अशा उपक्रमांमुळे सर्वसामान्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होते," असे मत जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी व्यक्त केले. त्यांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण कार्यक्रमाला विशेष उंची प्राप्त झाली.

या उपक्रमात जिल्हाध्यक्ष प्रताप नागरे यांनी अत्यंत सक्रिय भूमिका बजावत रुग्णांची नोंदणी, अभिप्राय व संपूर्ण व्यवस्थापनाची जबाबदारी स्वतः सांभाळली. प्रताप नागरे यांच्या समन्वयामुळे शिबिर शिस्तबद्ध व यशस्वीपणे पार पडले. समाजसेवेच्या दृष्टीने नॅशनलिस्ट कंज्यूमर प्रोटेक्शन ऑर्गनायझेशन सातत्याने अशा उपक्रमांचे आयोजन करत असल्याचेही यावेळी अधोरेखित झाले.

या प्रसंगी मातोश्री शीलाताई गडेकर, विजय नवघरे, अनिल वाल्ले, प्रमोद मानेकर, ॲड. श्रुता गडेकर, डॉ. अनिल काशीराम वाणी, चेतन शिंदे, काशीराम हरिभाऊ वाणी (PSI), सुनील काशीराम वाणी (पोलीस), आकाश अखमार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

प्रमुख अतिथी विजय नवघरे यांनी आयोजकांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. तसेच राज्याध्यक्ष संजय पाठक व विदर्भ अध्यक्ष अभिनंदन पेंढारी यांनी नॅशनलिस्ट कंज्यूमर प्रोटेक्शन ऑर्गनायझेशनच्या कार्याचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना प्राचार्य प्रशांत गडेकर यांनी, "समाजसेवा हीच खरी पूर्ती असून अशा उपक्रमांतून समाजऋण फेडण्याची संधी मिळते," असे सांगितले. तर प्रताप नागरे यांनी "मतभिन्नता असली तरी मनभिन्नता नसावी; समाजहितासाठी सातत्याने कार्य करणे हेच आमचे ध्येय आहे," असा संदेश दिला.

कार्यक्रमादरम्यान दीपप्रज्वलन प्रसंगी "इतनी शक्ति हमें देना दाता…" या गीताने वातावरण भारावून गेले. तसेच रेड कार्पेटवरून जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांचे स्वागत ही कार्यक्रमाची विशेष आकर्षक बाब ठरली.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रताप नागरे, चिरंजीव भाविक, कुमारी प्रचिती, चैतन्य लहाने, प्रतीक जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले. लक्ष्मी डेंटल क्लिनिकचे तज्ञ डॉ. अनिल वाणी यांच्या सेवाभावामुळे शिबिर अधिक प्रभावी ठरले.

कार्यक्रमास सेठी बाबूजी, विश्वास ब्रम्हेकर, सोहम बेलोकर, संजय जाधव तसेच विविध प्रशासकीय अधिकाऱ्यांनी भेट देऊन समाधान व्यक्त केले.

एकूणच, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या प्रेरणादायी उपस्थितीत व नॅशनलिस्ट कंज्यूमर प्रोटेक्शन ऑर्गनायझेशनच्या पुढाकारातून पार पडलेल्या या निःशुल्क दंत शिबिराने समाजसेवा, आरोग्यजागरूकता आणि लोकसहभाग यांचा सुंदर संगम घडवून आणत एक आदर्श निर्माण केला आहे.

# भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष मा. विश्वजीत भैय्या गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त दर्यापूर येथे रुग्णसेवा उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर** : भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष मा. विश्वजित भैया गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त आज दर्यापूर येथे सेवाभावी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. भाजपा अनुसूचित जाती मोर्चा मेळघाट, अमरावती यांच्या वतीने उपजिल्हा रुग्णालय, दर्यापूर येथे रुग्णांना फळ व बिस्कीट वाटप करून रुग्णसेवा करण्यात आली.

रुग्णांची विचारपूस, सुविधांचा आढावा

या उपक्रमादरम्यान पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी रुग्णालयातील प्रत्येक वार्डात जाऊन रुग्णांची विचारपूस केली. त्यांच्या प्रकृतीची आस्थेने चौकशी करत रुग्णालयात मिळणाऱ्या सुविधांबाबत माहिती जाणून घेतली.




वाढदिवसाच्या निमित्ताने रुग्णांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचा प्रयत्न या सेवाकार्यातून करण्यात आला.

**मान्यवरांची उपस्थिती**

यावेळी भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के, शहराध्यक्षा मेघाताई भारती, मदनराव बायस्कर, रविंद्र ढोकणे, जिल्हा महामंत्री नानाभाऊ माहुरे, सलीमभाई घाणीवाले, जिल्हा सचिव दिनेश पारडे, उपाध्यक्ष श्रीकांत धुमाळे, मयूर वांदे, वसंतराव रेवस्कर, बाळूभाऊ पाटेकर, देवीचरण सरकटे, भूषण पारडे, शंकर शेळके, सतिश शेळके, प्रविण थोटे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. संतोष डाबेराव यांनी यावेळी रुग्णालयात उपलब्ध असलेल्या वैद्यकीय सुविधांची सविस्तर माहिती दिली. भविष्यात रुग्णालयात ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्यात येणार असल्याची महत्त्वाची माहितीही त्यांनी दिली. अपघातग्रस्त रुग्णांना तातडीने उपचार मिळण्यासाठी हे केंद्र उपयुक्त ठरणार आहे.

**रुग्णांच्या चेहऱ्यावर समाधान**

वाढदिवसाच्या निमित्ताने राबवलेल्या या सेवाभावी उपक्रमामुळे रुग्णांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य उमटले. रुग्णांच्या नातेवाईकांनी व उपस्थित नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक केले. समाजाप्रती असलेली बांधिलकी अशा उपक्रमातून दिसून येते, अशा प्रतिक्रिया यावेळी व्यक्त झाल्या.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना महावितरणतर्फे विनम्र अभिवादन




**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू /संपादक नागपूर विभाग** : थोर समाजसुधारक, 'ग्रामगीता' या अजरामर ग्रंथाचे रचयिता आणि खंजिरी भजनाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाची ज्योत पेटवणारे आधुनिक संत, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त महावितरणच्या वतीने त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.नागपूर येथील काटोल रोडस्थित 'विद्युत भवन' या प्रादेशिक कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमात अधीक्षक अभियंता श्री. मंगेश वैद्य यांनी राष्ट्रसंतांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी बोलताना व्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती रिता ठाकरे यांनी राष्ट्रसंतांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. ग्रामीण विकास, अंधश्रद्धा निर्मूलन आणि जातिभेद निर्मूलनासाठी त्यांनी दिलेला संदेश आजही समाजासाठी दीपस्तंभासारखा मार्गदर्शक असल्याचे त्यांनी नमूद केले.

याप्रसंगी महावितरणच्या प्रादेशिक व परिमंडल कार्यालयातील विविध विभागांचे प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी राष्ट्रसंतांच्या स्मृतींना अभिवादन करून त्यांच्या विचारांचा वारसा जोपासण्याचा संकल्प केला.

# सिल्लोड पंचायत समिती कार्यालयात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख छत्रपती संभाजीनगर** : येथील पंचायत समिती कार्यालयात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती गुरुवारी (दि. ३०) मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. पंचायत समितीचे गटविकास अधिकारी दादाराव अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सहाय्यक प्रशासन अधिकारी दिपक गावंदे यांच्या शुभहस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. यावेळी कनिष्ठ प्रशासन अधिकारी श्रीमती रंजना कांबळे, विस्तार अधिकारी (पंचायत) राधाकिसन चौधरी, सहाय्यक लेखा अधिकारी उमेश मिसाळ, विस्तार अधिकारी (कृषी) जोगेंद्र आहीरराव,



राजेंद्र लांडगे, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) गट समन्वयक केशवकांत बुलबुले, वरीष्ठ सहाय्यक राजेंद्र शेळके, अश्फाक सय्यद, मेघा शिवपुरे, विठ्ठल गोडसे, सुनील गावंडे, भगवान फरकाडे, गणेश गोराडे, निर्मला कोल्हे, आरती धांडे, वंदना थोरात व बालिका खंडेलवाल तसेच कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गॅस पुरवठादारांची मनमानी; ४५ दिवस वाट पाहूनही टाकी गायब – विंचूरकर संतप्त"

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी** : विंचूर येथे घरगुती गॅस टंचाईने गंभीर रूप धारण केले असून गॅस पुरवठादारांच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. गॅस टाकीसाठी तब्बल ४५ दिवस प्रतीक्षा करूनही बुकिंग केल्यानंतर १५ ते २० दिवस टाकी मिळत नसल्याने नागरिक संतप्त झाले आहेत.

गावातील अनेक कुटुंबांनी सांगितले की, एकच गॅस टाकी असल्याने ती संपल्यानंतर स्वयंपाकाचा मोठा प्रश्न निर्माण होतो. काहींना लाकूड व इतर पर्यायी साधनांचा वापर करावा लागत असून दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होत आहे. गॅस एजन्सीकडे वारंवार संपर्क साधूनही "टाकी उपलब्ध नाही" असे उत्तर मिळत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. विशेषतः महिला वर्गाला या परिस्थितीचा मोठा फटका बसत आहे.

दरम्यान, हॉटेल व इतर व्यावसायिकांना गॅस टाक्या सहज उपलब्ध होत असताना सामान्य घरगुती ग्राहकांना टंचाईचा सामना




करावा लागत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. "हॉटेलांना गॅस, घरांना तुटवडा" अशी परिस्थिती निर्माण झाल्याने गॅस टाक्यांचा गैरवापर होत असल्याची शंका व्यक्त होत आहे. या प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून गॅस पुरवठा सुरळीत करावा, वितरण प्रक्रियेत पारदर्शकता आणावी आणि गैरप्रकारांवर लगाम घालावा, अशी मागणी केली आहे. अन्यथा नागरिकांचा रोष आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# शासनाच्या ऑनलाईन सेवांचा ठप्प कारभार; विद्यार्थ्यांचे हाल — तातडीने सेवा सुरू करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम** : महाराष्ट्र शासनाच्या डिजिटल सेवा पोर्टलमार्फत ( व ) विद्यार्थ्यांना मिळणारे विविध महत्त्वाचे दाखले — जसे की जातीचे प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र आदी — गेल्या चार दिवसांपासून ठप्प झाले आहेत. दिनांक २७ एप्रिल २०२६ पासून संबंधित वेबसाईट कार्यरत नसल्याने विद्यार्थ्यांसह नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

सदर सेवा 'महा-सेवा केंद्र' अंतर्गत दिल्या जात असून, या सेवांवर शैक्षणिक प्रवेश, शिष्यवृत्ती अर्ज, तसेच विविध शासकीय योजनांसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता अवलंबून असते.




मात्र, सलग चार दिवस सेवा बंद असल्याने अनेक विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज रखडले असून, त्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे.

शासनाच्या डिजिटल इंडिया उपक्रमांतर्गत नागरिकांना २४x७ सेवा उपलब्ध करून देण्याचा उद्देश असताना, वारंवार होणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे या सेवांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. संबंधित विभागाकडून "वेबसाईटचे काम सुरू आहे" अशी माहिती दिली जात असली, तरी सेवा कधी सुरू होणार याबाबत कोणतीही स्पष्टता देण्यात आलेली नाही.

या पार्श्वभूमीवर नागरिक व विद्यार्थी वर्गामधून तीव्र नाराजी व्यक्त होत असून, शासनाने तात्काळ लक्ष घालून सेवा पूर्ववत सुरू कराव्यात, तसेच भविष्यात अशा प्रकारच्या अडचणी टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

यासंदर्भात नागरिकांनी वर तक्रारी नोंदविण्यास सुरुवात केली असून, संबंधित यंत्रणेकडून त्वरित प्रतिसादाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# टेंभरून रानफळांची शहरवासीयांना भुरळ

**दैनिक युवक आधार** : आदिवासी डोंगराळ भागात औषधी वनस्पती सृष्टी बरोबरच उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणात रानफळांचा बहर आलेला आहे. डोंगरात भागात वेगवेगळी रान फळे उन्हाळ्यातील वैशाख ज्येष्ठ महिन्यात वसंत ऋतूत चाखायला मिळतात.

डोंगराळ भागात शेतीचे काम करणारे शेतकरी, ढोर चारणारे गुराखी, पायवाटेने पायपीट करणारे पाहुणे, रावळे, खेड्यातील लहान मुलं उन्हाळ्यात उष्णतेची तीव्रता वाढत असतानाही रानफळे शोधण्यासाठी जंगलातील पायवाटेने धुंडाळतात. टेंभरून झाडाची उंची ५० ते ६० फुटापर्यंत वाढते. झाडाची साल वरून काळसर असते त्याचा आयुर्वेदिक औषधी म्हणून खोकल्यासाठी वापर केला जातो. आदिवासी गोंडी बोलीत या झाडाला तेंदू म्हणतात. टेंभुर्णीच्या पानापासून व पत्रावळी बनवतात. आदिवासी बांधव डोंगराळ भागात फिरून टेंभुर्णीची फळ तोडून घेत पिकवून बाजारात नेऊन आर्थिक उदरनिर्वाहासाठी विक्री करतात.

टेंभुर्णीचे लाकूड लवचिक असते त्यामुळे लवकर पेटत नाही आणि भेटले तर लवकर विझत नाही फाट्यांचा पेटतांना कटकट आवाज येतो .

**संकलन : सुभाष कामडी**
**( आदिवासी साहित्य अभ्यासक)**



## राज्यात ३०० कोटी वृक्षलागवडीच्या हरित आयोगाच्या नियामक मंडळावर एका दिवसात ७० लाख वृक्ष लागवडीचा ‘रेकॉर्ड’ गाजवणाऱ्या बीड प्रशासनाला संधी द्या . :— डॉ .गणेश ढवळे

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :-** राज्यात ३०० कोटी वृक्ष लागवडीच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमासाठी स्थापन करण्यात आलेल्या हरित महाराष्ट्र आयोगाच्या नियामक मंडळावर बीड जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांना स्थान द्यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ.गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केली आहे. या बाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड सुनेत्रा पवार, वनमंत्री गणेश नाईक आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे. राज्य सरकारने २०४७ पर्यंत ३०० कोटी वृक्षलागवडीचा संकल्प जाहीर केला असून त्याची अंमलबजावणी हरित महाराष्ट्र आयोगामार्फत केली जाणार आहे. आयोगाच्या नियामक मंडळात मुख्यमंत्री अध्यक्ष, उपमुख्यमंत्री उपाध्यक्ष तसेच वन, पर्यावरण, कृषी आणि रोजगार हमी योजना मंत्री यांचा समावेश असणार आहे. या उपक्रमासाठी सुमारे २७ लाख हेक्टर जमिनीची आवश्यकता असल्याचे ही सरकारने स्पष्ट केले आहे. दरम्यान, बीड जिल्हा प्रशासनाने यापूर्वी एका दिवसात ३० लाख, ६३ लाख आणि तब्बल ७० लाख वृक्षलागवडीचे ‘रेकॉर्ड’ प्रस्थापित केल्याचा दावा




करण्यात आला आहे. या कामगिरीची “इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड” मध्ये नोंद होऊन तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले होते. जागेच्या उपलब्धतेबाबत राज्य सरकारने चिंता करण्याची गरज नसून कमी जागेत अधिकाधिक वृक्ष लागवड करण्याचे कौशल्य बीड प्रशासनाकडे असल्याचा दावा करत, या ‘महारथी’ अधिकाऱ्यांना हरित महाराष्ट्र आयोगाच्या नियामक मंडळावर संधी देण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

# नंधाना शाळेत इतिहास; दोन आदर्श शिक्षक एकाच दिवशी सेवानिवृत्त

## विद्यार्थ्यांच्या मनात घर करणाऱ्या बोरकर- सोमटकर सरांना अश्रुपूर्ण निरोप

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : रिसोड तालुक्यातील नंधाना येथील जि.प. डिजिटल वरिष्ठ शाळेत आज (दि. ३० एप्रिल २०२६) एक भावनिक आणि अभिमानास्पद क्षण अनुभवायला मिळाला. शाळेतील दोन आदर्श शिक्षक—संजय रामचंद्र बोरकर आणि गजानन प्रल्हाद सोमटकर—यांनी तब्बल अनेक वर्षांची निस्वार्थ सेवा पूर्ण करून एकाच दिवशी सेवानिवृत्ती स्वीकारली.

संजय बोरकर सरांनी आपल्या सेवाकाळात विविध ठिकाणी शासकीय बदली होऊनही कधीही कामचुकारपणा न करता शिक्षकी पेशा अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडला. प्रत्येक ठिकाणी ते विद्यार्थ्यांचे लाडके शिक्षक ठरले. विशेष म्हणजे, आपल्या जन्मभूमी नंधाना येथील शाळेतच त्यांची कारकीर्द संपन्न झाली, ही बाब त्यांच्या आयुष्यातील अभिमानाची ठरली.




तर गजानन प्रल्हाद सोमटकर सर हे मूळचे घाटा येथील असले तरी त्यांनी नंधाना गावावर जिवापाड प्रेम केले. त्यांनी आपल्या कार्यकाळात केवळ शिक्षक म्हणून नव्हे, तर गावाचा एक जबाबदार सदस्य म्हणून आपुलकीची नाती जपली. “आदर्श शिक्षक कसा असावा” याचे जिवंत उदाहरण त्यांनी आपल्या कार्यातून घालून दिले.

दोन्ही शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सतत प्रयत्न करत, पालकांशी संवाद साधत डिजिटल युगातही परिषद शाळेचे महत्त्व पटवून दिले. इयत्ता १ ते ७ पर्यंत विद्यार्थ्यांची संख्या टिकवून ठेवण्यात त्यांनी मोठे योगदान दिले. त्यांच्या कार्यामुळे शाळेची ओळख केवळ शिक्षणापुरती मर्यादित न राहता संस्कारांच्या मंदिरासारखी बनली.

विशेष म्हणजे, दोघांची नोकरीही एकत्र सुरू झाली आणि शासकीय बदल्यांमुळे अनेक वेळा एकाच शाळेत नियुक्ती मिळाली. आज सेवानिवृत्तीही एकाच दिवशी झाल्याने हा योगायोग नव्हे, तर एक प्रेरणादायी प्रवास असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. त्यांच्या संपूर्ण सेवाकाळात कोणतीही तक्रार नोंदली गेली नाही, हीच त्यांच्या प्रामाणिकतेची साक्ष आहे.

निवृत्ती समारंभानिमित्त नंधाना गावातील ग्रामस्थ, पालकवर्ग व पंचक्रोशीतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावकऱ्यांनी दोन्ही शिक्षकांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी बोरकर व सोमटकर सरांनीही गावाबद्दलची आपली प्रेमभावना व्यक्त करत, “शाळेच्या अडचणीच्या काळात आम्ही नेहमीच मदतीसाठी उभे राहू,” असे आश्वासन दिले.

“शिक्षक कधी निवृत्त होत नाही, तो विद्यार्थ्यांच्या यशात कायम जिवंत राहतो,” या भावनिक शब्दांनी वातावरण भारावून गेले.

दोन्ही शिक्षकांनी आपल्या कार्यातून हेच दाखवून दिले की, ज्ञान देणं ही नोकरी नसून ती आयुष्यभराची साधना असते.

नंधाना गावाने आज दोन शिक्षकांना निरोप दिला असला, तरी त्यांच्या कार्याचा सुगंध आणि संस्कारांची शिदोरी पुढील पिढ्यांना प्रेरणा देत राहणार आहे.

## रेवदंडा आंग्रेनगरमध्ये साईबाबा उत्सव: धार्मिक श्रद्धा आणि सामाजिक सेवेचा अनोखा संगम

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा** : रेवदंडा आंग्रेनगरमधील साईबाबा उत्सव मंडळाने यंदाही भक्ती, भजन आणि सामाजिक सेवेचा अनुपम उत्सव साजरा केला. हा उत्सव केवळ धार्मिक सोहळा नसून, स्थानिक लोकांना एकत्र आणणारा सामाजिक एकोप्याचा प्रतीक ठरला. मंडळाचे अध्यक्ष अनिल चेवले, खजिनदार रोशन झावरे, सचिव संजय झावरे आणि उपाध्यक्ष दुष्यंत झावरे यांच्या नेतृत्वाखालील या उत्सवाने गोरगरीबांना आधार देण्यापासून लहान मुलांच्या कलागुणांना वाव देण्यापर्यंत सर्वांगीण योगदान दिले. विशेषतः दुष्यंत झावरे यांचे निस्वार्थी सामाजिक कार्य यामुळे चर्चेत आहे.

दुष्यंत झावरे हे आंग्रेनगरचे खरे 'जनसामान्यांचे भाऊ' म्हणून ओळखले जातात. सामाजिक कार्यकर्ते म्हणून त्यांची ख्याती आहे की, ते नेहमीच गरजवंतांच्या मदतीला रात्री-अपरात्री धावून येतात. वादळी वारा, जोरदार पाऊस किंवा इतर संकटकाळी ते



गोरगरीबांच्या घरबोळयात पोहोचतात आणि तात्काळ मदत पुरवतात. साईबाबा उत्सवाच्या निमित्ताने त्यांनी साईबाबा चरणी नतमस्तक होऊन आंग्रेनगर आणि आजूबाजूच्या सर्व जनतेचे रक्षण करण्याची प्रार्थना केली. "साईबाबा चरणी आम्ही गाऱ्हाणे मांडली, की हे संपूर्ण क्षेत्र वादळ, पावसापासून आणि येणाऱ्या संकटांपासून सुरक्षित राहो," असे दुष्यंत झावरे यांनी सांगितले. ही प्रार्थना केवळ वैयक्तिक नसून, संपूर्ण समुदायाच्या हिताची आहे, जे त्यांच्या व्यापक विचारसरणीचे दर्शन घडवते.

उत्सवात महाप्रसाद वितरण हा प्रमुख आकर्षणाचा ठरला. शेकडो भक्तांना साईबाबा प्रसाद मिळाला, ज्यामुळे लहान-मोठे सर्वजण एकत्र जमले. या उत्सवाला रायगड जिल्हा परिषद सदस्य दिलीप उर्फ छोटम शेठ भोईर, रायगड जिल्हा परिषद सदस्य सचिन राऊळ, ग्रामपंचायत सदस्य राजन वाडकर, नारायण पाटील, ॲड रोहित भोईर, टिनू भोईर वैगरे प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता याशिवाय सांस्कृतिक कार्यक्रमांनी उत्सवाला तेज दिले. लहान मुलांसाठी विशेष 'रेकॉर्ड डान्स' स्पर्धा आयोजित करण्यात आली, ज्यात स्थानिक बच्चे कंपनीने आपल्या नृत्यकलेने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. हे उपक्रम स्थानिक कलागुणांना प्रोत्साहन देणारे ठरले. "आम्ही नेहमीच असे कार्यक्रम आयोजित करतो जे समुदायाला एकत्र आणतात आणि लहान मुलांना व्यसनांपासून दूर ठेवतात," असे मंडळाचे अध्यक्ष अनिल चेवले यांनी सांगितले.

सचिव संजय झावरे आणि खजिनदार रोशन झावरे यांच्या अथक प्रयत्नांमुळे उत्सव यशस्वी झाला. साईबाबा मंडळाने उत्सवात पर्यावरण संरक्षणाचा संदेशही दिला – प्लास्टिकविरहित उपक्रम आणि झाडे लावण्याचा उपक्रम राबवला. दुष्यंत झावरे यांच्या नेतृत्वाखाली मंडळाने गेल्या काही वर्षांत अनेक सामाजिक उपक्रम राबवले आहेत, जसे की गरजूंसाठी अन्नधान्य वितरण, शालेय साहित्य पुरवठा आणि आपत्तीग्रस्तांना मदत. "साईबाबा उत्सव हा आपल्या श्रद्धेचा उत्सव असला तरी, तो सामाजिक सेवेचा पाया आहे," असे रोशन झावरे यांनी नमूद केले.हा उत्सव पाहता आंग्रेनगरमधील साईबाबा उत्सव केवळ धार्मिक नाही तर सामाजिक एकतेचा उत्सव आहे. निस्वार्थी कार्यकर्त्यांमुळे असे उपक्रम यशस्वी होतात, जे समाजासाठी प्रेरणादायी ठरतात.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत भाऊ ठार बहिण गंभीर जखमी !

### हिवरा संगम जवळ अपघाताची मालिका सुरूच!

**दैनिक युवक आधार**

**मनोज सुरोशे महागाव:- (यवतमाळ ) :** महागाव तालुक्यातील हिवरा संगम नॅशनल हायवे ३६१ वर मुस्लिम कब्रस्तान जवळबहिणीला घेऊन दुचाकीने पुसद वरुन माहुर येथे परीक्षेला जात असताना अज्ञात पिकप वाहनाने दुचाकीला दिलेल्या जबर धडकेत भावाचा जागिच मृत्यू झाला तर बहिण गंभीर जखमी झाल्याची घटना काल बुधवारी २९ एप्रिल रोजी सकाळी घडली, बुध्दभुषण राजू भालेराव (वय २६) असं मृतकाचे नाव आहे तर विशाखा राजू भालेराव (वय २०) दोन्ही रा. लक्ष्मी नगर पुसद असे जखमीचे नाव आहे.

पुसद येथील लक्ष्मीनगर परिसरातील बुध्दभुषण राजू भालेराव (वय २६) हा आपल्या बहिणीसह विशाखा राजू भालेराव (वय २०) मोटारसायकल क्रमांक एम.एच २९ सी ई ३३१२ ने माहूर येथे परीक्षा देण्यासाठी जात होता.दरम्यान, धनोडा बाजूकडून रॉंग साईडने येणाऱ्या अज्ञात चारचाकी वाहनाने त्यांच्या मोटारसायकलला समोरून जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत चालक बुध्दभुषण भालेराव याच्या डोक्याला



गंभीर दुखापत होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला, तर बहिण विशाखा भालेराव गंभीर जखमी झाली आहे.

जखमी विशाखाला तात्काळ ॲम्बुलन्सच्या मदतीने पुसद येथे उपचारासाठी हलविण्यात आले. अपघातानंतर वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती; मात्र अपघातग्रस्त वाहन बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली.

प्राथमिक माहितीनुसार, अज्ञात वाहन चालकाने रॉंग साईडने वाहन चालविल्यामुळे हा अपघात घडल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. घटनास्थळावर महागाव पोलीस महामार्ग पोलीस तात्काळ दाखल होते रॉंगसाईट येणारे संबंधित वाहनचालकाचा शोध महागाव पोलिसांसमोर उभे ठाकले असून पुढील तपास ठाणेदार धनराज निळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## माजी जि प सदस्य सुभाष आजबले यांच्या वाढदिवसानिमित्त शाल, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ ,देऊन संजीव भांबोरे यांच्या हस्ते सत्कार



**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे** : भंडारा-तालुक्यातील रावणवाडी येथील जय किसान रेस्टॉरंट येथे आज दिनांक 30 एप्रिल 2026 ला दुपारी 12 वाजता माजी जि प सदस्य व समाज सुधार पतसंस्था वाकेश्वर चे अध्यक्ष सुभाष आजबले यांचा अखिल भारतीय भारतीय ध्रुवतारा अपंग क्रांतीकारी सामाजिक संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संजीव भांबोरे यांनी शाल ,प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला, त्याचप्रमाणे भंडारा जि .प .अध्यक्षा सौ .कविता जगदीश उईके यांनी सुद्धा त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला, यावेळी पहेला गोलेवाडी राईस मिलचे संचालक बोधराज भोयर ,माजी पंचायत समिती सदस्य अरुण गोंडाणे, यांनी सुद्धा त्यांचा सत्कार केला. यावेळी बरेच नागरिक उपस्थित होते.

## जुगारावर कारवाई

**स्टीलच्या चाइल्ड पार्टची चोरी**

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : अज्ञात आरोपीने दीड कोटी रुपयांच्या स्टीलचे चाइल्ड पार्ट्स चोरून नेल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात 28 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.फिर्यादी काम करत असलेला टाटा प्रॉडक्ट लिमिटेड कंपनीचे पलावा डोंबिवली या ठिकाणी शिळफाटा ते कल्याण असे रेल्वे लाईनच्या वर ब्रिजच्या कामासाठी लागणारे दीड कोटी रुपयांचे स्टीलचे चाईल्ड पार्ट हे पनवेल येथील करंजाडे सेक्टर वन मधील रेल्वेच्या जागेतील ओपन स्टोअर्स मध्ये ठेवले आहेत. हे स्टील चाइल्ड पार्ट्स अज्ञात इसमाने चोरून नेले.

# सेवानिवृत्ती समारंभ सोहळा एका विद्यापीठाचा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल/प्रतिनिधी :** सुधागड एज्युकेशन सोसायटी पालीच्या फक्त कोपरा विद्यालय(खारघर) आणि बांठिया माध्यमिक विद्यालय व एन.एन. पालीवाला उच्च माध्यमिक विद्यालय,नवीन पनवेल येथे ३४ वर्षे मुख्याध्यापक म्हणून सेवा बजाविलेले सन्माननीय भगवान शिवदास माळी हे ३१ मे २०२६ रोजी नियत वयानुसार सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्यासोबत त्यांच्या सौभाग्यवती सौ.रेखा भगवान माळी या ८ वर्षे अगोदर स्वेच्छानिवृत्ती घेत आहेत. शाळांच्या पुढील उन्हाळी सुट्टीमुळे हा समारंभ सोहळा २७ आणि २८ एप्रिल रोजी सलग दोन दिवस नभूतो न भविष्यती असा साजरा करण्यात आला.शेकडो हितचिंतक मित्रांनी,सहकाऱ्यांनी, आप्तेष्ट आणि नातेवाईकांनी माळी सरांच्या विषयीच्या आपल्या मनातील भावनांना मोकळी वाट करून दिली.अनेकांना अश्रू अनावर झाले,काहींना गहिवरून आले.काहींना आपली भाषणे थांबवावी लागली.एवढा चांगूलपणा या व्यक्तींमध्ये ओतप्रोत भरला आहे.

माळी सरांची सेवा सुरू होतानाच मुख्याध्यापक म्हणून झाली.कदाचित हा सुद्धा विक्रमच असेल.कोपरा हायस्कूलमध्ये सलग २५ वर्ष आणि बांठीया कॉलेजमध्ये सलग ९ वर्षे त्यांनी सेवा दिली.महाराष्ट्र मुख्याध्यापक महासंघाच्या रायगड शाखेचे सलग दोन वेळा अध्यक्ष राहिलेल्या माळी सरांचे अनमोल मार्गदर्शन रायगड शिक्षण खात्यात येणारा प्रत्येक अधिकारी घेत असल्याचे उपस्थित सर्व अधिकाऱ्यांनी आपल्या भाषणात जाहिरपणे सांगितले.

पनवेल तालुका आदर्श शिक्षक पुरस्कार आणि रायगड जिल्हा आदर्श शिक्षक या शासकीय पुरस्कारावरती मोहोर उमटवीलेल्या माळी सरांना भारतातील आणि परदेशातील अनेक आंतरराष्ट्रीय



**के.आं.बांठिया माध्यमिक विद्यालय(मराठी व इंग्रजी माध्यम) आणि एन.एन. पालीवाला उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य भगवान शिवदास माळी यांचा सेवानिवृत्ती आणि सौ.रेखा भगवान माळी याचा स्वेच्छानिवृत्तीनिमित्त गौरव सोहळा संपन्न**

संस्थांनी गौरवीले आहे.बांठीया विद्यालय हे सुधागड सोसायटीतील पहिले व नवी मुंबई तसेच रायगड जिल्ह्यातील दुसरे,असे महाविद्यालय आहे की,ज्याला आय.एस.ओ.मानांकन प्राप्त झाले आहे.या विद्यालयात ५००० विद्यार्थी शिक्षण घेत असतात,तर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आहेत २०० च्या वरती.९ वर्षांपूर्वी माळी सर येथे आले, त्यावेळी काही कारणांमुळे पनवेलमधील सर्वात मोठे कॅंपस असणारी ही शाळा डबघाईला आली होती आणि शिक्षणाचा दर्जा घसरल्यामुळे विद्यार्थी संख्या घटत होती.अशावेळी संस्थेने माळी सरांची ईच्छा नसताना ही जबाबदारी त्यांच्यावर सोपवीली,९ वर्षात रात्रीचा दिवस करून आणि सहकारी शिक्षकावरती विश्वास ठेवून जबाबदारीचे विकेंद्रीकरण करून विद्यालयाचा शैक्षणिक दर्जा उंचावला.नवीन पनवेल मधील पालकांचा विश्वास संपादन केला.तसेच इमारतीची दुरुस्ती करून रंगरंगोटी केली.अद्ययावत प्रयोगशाळा, अत्याधुनिक संगणक कक्ष,१ हजार बेंचचे नुतनीकरण, संपूर्ण शाळेत सी.सी.टी.व्ही.असा आय.सी.एस.ई व सी.बी.एस.ई.बोर्डाच्या शाळांना लाजवेल असा साज बाठीया महाविद्यालयाला चढवीला.तर ३४ वर्षांपूर्वी कोपरा शाळा गावाच्या हनुमान मंदीरातून सुरू झाली होती.आज तेथे तीन मजली इमारतीसह सर्व अत्याधुनिक लॅब्स उपलब्ध आहेत.तेथे पाचशे विद्यार्थी शिक्षण घेतात.माळी सरांचे अनेक विद्यार्थी डॉक्टर,वकील,इंजिनिअर झाले आहेत. काही परदेशात स्थायिक झाले आहेत.तर काहीजण भारतीय सैन्यदलात आणि प्रशासनात आपली सेवा देत आहेत.काहीजण समाजकारण आणि राजकारणात आपला ठसा उमटवत असून काहीजण पनवेल महानगरपालिकेत नगरसेवक,सभापती म्हणूनही उत्तम काम करीत आहेत.माळी सर या माणसाने शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सुद्धा आपले अनमोल असे योगदान दिले आहे.आजपर्यंत शेकडो फी अभावी शाळा सुटलेल्या गरीब विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देऊन शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे महत्कार्य त्यांनी अविरतपणे राबवीले आहे.माळी सरांना नियतीने दिलेल्या संधीचे त्यांनी पिडीत आणि गरजूंना मदत करून सोने केले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या विद्यमान अध्यक्षा सौ.गिताताई पालरेचा आणि प्रमुख पाहुणे होते कोकण शिक्षक मतदारसंघाचे माजी आमदार सन्माननीय बाळाराम पाटील साहेब.

प्रमुख उपस्थितांमध्ये सु.ए.सो.पाली चे उपाध्यक्ष रवींद्र लिमये,सचिव ग.रा.म्हात्रे,संचालक आणि मुख्याध्यापक प्रतिनिधी राजेंद्र पालवे,सी.ई.ओ.मिलिंद जोशी, संचालक विवेक मोहिते तसेच सुधागड एज्युकेशन सोसायटीचे मान्यवर पदाधिकारी,राजिपचे माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सन्माननीय महारूद्र नाळे,पनवेल महानगरपालिका शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण,राजिप प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी सौ.दहितुले मॅडम,गट शिक्षणाधिकारी साबळे सर त्याचबरोबर शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर आणि रायगड जिल्हा मुख्याध्यापक संघाचे उपाध्यक्ष अरूण उतेकर,सचिव विनय मार्गे, सल्लागार व्ही.व्ही.पाटील, पनवेल तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष पंकज भगत,उपप्राचार्य,पर्यवेक्षक,सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी,कोपरा हायस्कूलचे सर्व शिक्षक आणि मुख्याध्यापक,तसेच नगरसेवक एड.नरेश ठाकूर,संतोष तांबोळी,तोडेकर साहेब आणि नागरिक तसेच कळंबोली येथील दोन्ही विद्यालयांचे मुख्याध्यापक याचबरोबर माळी सरांचे विविध क्षेत्रातील मित्र आणि आप्तेष्ट नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दोन दिवस चाललेल्या या जानदार आणि शानदार कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रणदिवे सरांनी आपल्या अमोघ वाणीने केले तर प्रास्ताविक उपमुख्याध्यापक आंब्रे सर आणि उपप्राचार्य बी यु महाजन सरांनी केले. तसेच आभार प्रदर्शन पर्यवेक्षक बी.यु.महाजन सरांनी केले.

# नाशिक दौऱ्यावरून बागेश्वर धाम बाबा वादात; अंनिसचा जोरदार विरोध

## अंधश्रद्धेला खतपाणी, महापुरुषांचा अवमान ; कार्यक्रम रद्दची मागणी

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी** : बागेश्वर धाम बाबा म्हणून ओळखले जाणारे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्या २ मे रोजी नाशिक येथे होणाऱ्या कार्यक्रमावरून वाद निर्माण झाला असून, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस)ने या कार्यक्रमाला तीव्र विरोध दर्शवला आहे. कार्यक्रम तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी मागणी करत अंनिसने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे.

अंनिसच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, धीरेंद्र कृष्ण शास्त्री हे चमत्कारासारखे दावे करून समाजात अंधश्रद्धेला खतपाणी घालतात. तसेच महाराष्ट्रातील संत आणि महापुरुषांबाबत, विशेषतः संत तुकाराम व छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी आक्षेपार्ह वक्तव्ये केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे हा प्रकार केवळ त्या महापुरुषांचा नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या भावना दुखावणारा असल्याचे अंनिसने म्हटले आहे.

तसेच, व्यक्तीच्या मनातील प्रश्न ओळखून दैवी उत्तर देण्याचा दावा हा वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या विरोधात असून, महाराष्ट्रात लागू असलेल्या जादूटोणाविरोधी कायद्याचे उल्लंघन असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



अंनिसने धीरेंद्र शास्त्री यांना खुले आव्हान देत, त्यांच्या चमत्कारिक दाव्यांची वैज्ञानिक कसोटीवर पडताळणी करण्याची मागणी केली आहे. शासकीय अधिकारी, तज्ज्ञ, पत्रकार आणि संघटनेच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत १० व्यक्तींची नावे, पत्ते व त्यांच्या मनातील प्रश्न अचूक ओळखून दाखवावेत.

असे सिद्ध केल्यास अंनिसकडून २१ लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल, असेही जाहीर करण्यात आले आहे.

दरम्यान, कार्यक्रम रद्द न झाल्यास अंनिस व समविचारी संघटना लोकशाही मार्गाने शांततापूर्ण आंदोलन छेडतील, असा इशाराही नि वेदनातून देण्यात आला आहे.

या निवेदनावर अंनिसचे राज्य प्रधान सचिव डॉ. टी. आर. गोराणे, राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे आणि बुवाबाजी संघर्ष विभागाचे महेंद्र दातरंगे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शिस्तीने आणि स्वकर्तृत्वाने वेगळी ओळख निर्माण केलेले मुख्याध्यापक श्री विलासराव कोळेकर

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (शांताराम गुडेकर ) :** रत्नागिरी जिल्ह्यात शैक्षणिक क्षेत्रात स्वत:ची ओळख शिस्त आणि स्वकर्तृत्वाने वेगळी ओळख निर्माण केलेले मुख्याध्यापक म्हणजेच श्री विलासराव कोळेकर होय. असे उद्गार पद्मश्री दादा इदाते यांनी काढले. दि मॉडेल इंग्लिश स्कुल सैतवडे येथील मुख्याध्यापक श्री विलासराव कोळेकर यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित केलेल्या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. श्री इदाते पुढे म्हणाले शैक्षणिक क्षेत्रातील अनेक आव्हाने असतानाही अत्यंत कल्पकतेने व सकारात्मक वृत्तीने सातत्याने काम करुन शाळा व संस्थेचे नाव त्यांनी उज्वल केले आहे. शैक्षणिक क्षेत्राबरोबरच पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रातील त्यांचा सहजतेने वावर होता. एक कुशल संघटक व उपक्रमशिल मुख्याध्यापक म्हणून श्री विलासराव कोळेकर यांनी कौतुकास्पद काम केले आहे असेही ते म्हणाले. यावेळी माजी मंत्री महादेव जानकर, माजी आमदार भगवान साळुंखे, शिक्षणाधिकारी (योजना) किरण लोहार, जयगड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस



निरीक्षक संजय पाटील, रत्नागिरी जिल्हा माध्यमिक अध्यापक संघाचे अध्यक्ष सागर पाटील, जि. प. सदस्या सौ. उषा सावंत,अरुण मोर्ये,सोसायटीचे अध्यक्ष रहीम माद्रे, बाबासाहेब राशिनकर आदी अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले. व शाळेच्या चौफेर प्रगतीबद्दल कौतुक केले. श्री विलासराव कोळेकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.दि मॉडेल इंग्लिश स्कूल सैतवडेचे मुख्याध्यापक श्री. विलासराव कोळेकर सर यांचा सेवानिवृत्ती सोहळा अत्यंत उत्साहात आणि तितक्याच भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. त्यांच्या प्रदीर्घ आणि देदीप्यमान सेवेचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या समारंभाने संपूर्ण सैतवडे परिसराचे लक्ष वेधून घेतले.

मुस्लिम एज्युकेशन सोसायटी, सैतवडे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री नामदार महादेव जानकर यांची विशेष उपस्थिती लाभली होती. कोळेकर सरांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात केवळ शाळाच चालवली नाही, तर ती एका वटवृक्षाप्रमाणे विस्तारली. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे दि मॉडेल इंग्लिश स्कूलने शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात एक वेगळा ठसा उमटवला आहे. कोळेकर सरांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात केवळ शाळाच चालवली नाही, तर ती एका वटवृक्षाप्रमाणे विस्तारली. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे दि मॉडेल इंग्लिश स्कूलने शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात एक वेगळा ठसा उमटवला आहे. यावेळी मुस्लिम एज्युकेशनचे अध्यक्ष रहीम माद्रे, अक्रम कापडे, रज्जाक फकीर, अजिज वागळे, हशमत निवेकर, गनी खतीब, रूमान पारेख, तौफिक चिकटे, अजिज माद्रे, मुख्याध्यापक सर्वश्री व्ही. वाय कुंभार, प्रकाश वंजोळे, श्रीमती सिद्धी लांजेकर, इमरान अंतुले, अरुण जाधव, श्रीशैल्य पुजारी, आशिष वासावे, सुनिल पाटील यांचेबरोबरच, पत्रकार सर्वश्री बाबासाहेब राशिनकर, सुनिल पवार, वैभव पवार, संजय कदम, राजेश जोष्टे, अनिकेत पवार, दिपक पोतदार उपस्थित होते.तसेच तंटामुक्तीचे सैतवडेचे अध्यक्ष दिलावर खान,जांभारीचे सरपंच आदेश पावरी, हर्षल पेढे, संजय शितप, राजेश जाधव, डॉ. जाधव, माजी सरपंच गणेश झगडे, आंबा उद्योजक उमेश रहाटे, कवीवर्य अरुण मोर्ये, संभाजी जाधव, नितीन जाधव, चव्हाण सर, केंद्र प्रमुख अरविंद महाकाळ, शिक्षण विस्तार अधिकारी तोटावार मॅडम,आदी मान्यवर व ग्रामस्थ, माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रभावी सुत्रसंचालन विनोद पेढे यांनी केले.सर्वांचे अविनाश केदारी यांनी आभार मानले.

# पनवेल महानगरपालिकेकडून महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण व भव्य सांस्कृतिक कार्यक्रम सोहळ्याचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : पनवेल महानगरपालिकेच्या वतीने 1मे रोजी महाराष्ट्र दिन, कामगार दिनानिमित्त ध्वजारोहण तसेच बुद्ध पौर्णिमा निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर 'प्रिय आमुचा महाराष्ट्र' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनही करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्याच्या ६७व्या स्थापना दिनानिमित्त पनवेल महानगरपालिका मुख्यालयात सकाळी ७ वाजता ध्वजारोहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार असून, उपमहापौर, आयुक्त, विविध समित्यांचे पदाधिकारी, सर्व नगरसेवक व महापालिका अधिकारी, यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

पनवेल महानगरपालिकेतर्फे महाराष्ट्र दिन, कामगार दिन आणि बुद्ध पौर्णिमेचे औचित्य साधून 'प्रिय अमुचा महाराष्ट्र' या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्राची गौरवशाली परंपरा आणि महापुरुषांच्या पराक्रमाचा वारसा उलगडणारा हा विशेष कार्यक्रम शुक्रवार, १ मे रोजी सकाळी ११ वाजता आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे संपन्न होणार आहे.

'टॅलेंट बॉक्स इव्हेंट्स अँड एन्टरटेनमेंट' निर्मित 'प्रिय अमुचा महाराष्ट्र' हा कार्यक्रम ५१ कलाकारांच्या संचाद्वारे सादर केला जाणारा एक 'महाकलाविष्कार' आहे. यामध्ये महाराष्ट्राच्या मातीतील लोककला, संस्कृती आणि छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले अशा थोर महापुरुषांच्या जीवनकार्यावर आधारित विविध सादरीकरणे प्रेक्षकांना पाहायला मिळतील. या सोहळ्याच्या माध्यमातून पनवेलकरांना महाराष्ट्राच्या वैभवशाली संस्कृतीचा अनुभव घेता येणार आहे.

तरी नागरिकांनी मोठ्या संख्येने या सांस्कृतिक कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे. या दोन्ही कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना करण्यात आले आहे.

# महेंद्रशेठ घरत यांच्यातर्फे 'महाराष्ट्र दिना'निमित्त कामगार आणि पत्रकारांना 'राजा शिवाजी' चित्रपटाची पहिल्या शोची मेजवानी!

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी** : जागतिक कामगार दिन आणि 'महाराष्ट्र दिना'निमित्त शुक्रवारी (ता. १ मे) आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी कामगार आणि त्याचे कुटुंबीय, तसेच पत्रकारांसाठी 'राजा शिवाजी' या ऐतिहासिक चित्रपटाची अनोखी मेजवानी देण्याचे ठरविले आहे. 'राजा शिवाजी' हा शिवरायांवरील भव्यदिव्य चित्रपट शुक्रवारी (ता. १) प्रदर्शित होत आहे. 'राजा शिवाजी' हा चित्रपट एकाच दिवशी मराठी, हिंदी आणि तेलगू भाषांत प्रदर्शित होत आहे. प्रसिद्ध अभिनेते रितेश देशमुख, जेनेलिया देशमुख, संजय दत्त, अभिषेक बच्चन, विद्या बालन, फरदिन खान, सलमान खान, सचिन खेडेकर, महेश मांजरेकर, बोमन इराणी अशा कलाकारांचा अभिनय असलेला आणि अजय-अतुल यांचे संगीत लाभलेला हा चित्रपट आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावरील या ऐतिहासिक चित्रपटाचा पहिला शो पाहण्याची संधी महेंद्रशेठ घरत यांनी कामगार आणि पत्रकारांना महाराष्ट्र दिनी आणि जागतिक कामगार दिनी दिली आहे. त्यामुळे कामगार नेता कसा असावा, तर तो महेंद्रशेठ घरत यांच्यासारखा, अशा भावना कामगारांमधून व्यक्त होत आहेत. 'राजा शिवाजी' चित्रपट पनवेल येथील ओरियन मॉलमध्ये शुक्रवारी (ता. १ मे) सायंकाळी ६.३० चा शो, पीव्हीआर, स्क्रीन-१ वर पाहण्यासाठी कामगार आणि पत्रकारांनी वैभव पाटील (मोबाईल- ९८१९३२५५५४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन न्यू मेरिटाईम अँड जनरल कामगार संघटनेतर्फे करण्यात आले आहे.

# “सूर्यनारायणची हुकूमशाही रस्त्यांवर ! उरणकर घामाने हैराण” जणूकलम 144 सारखा शुकशुकाट;

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** एप्रिल महिन्यातच उन्हाने अक्षरशः थैमान घातल्याने उरण तालुक्यात नागरिकांचे जगणे मुश्कील झाले आहे. तापमानाने कडेलोट गाठल्यामुळे शहरासह ग्रामीण भागात दुपारी बाहेर पडणे कठीण झाले असून, दुपारी बारा ते पाचच्या दरम्यान रस्त्यांवर अक्षरशः 144 कलम लागू असल्यासारखा शुकशुकाट पाहायला मिळत आहे.

काही दिवसांपूर्वी अवकाळी पावसामुळे उष्णतेपासून थोडासा दिलासा मिळाला होता. मात्र त्यानंतर उन्हाने पुन्हा आक्रमक पाउल उचलीत वातावरणात मोठा बदल घडवला आहे. आबालवृद्धांना घामाच्या धारांचा सामना करावा लागत असून, अंगाची काहिली वाढत चालली आहे.

वाढत्या तापमानाचा फटका केवळ माणसांनाच नव्हे तर पशु-पक्ष्यांनाही बसू



लागला आहे. पाण्याच्या शोधात प्राणी-पक्षी पाणवठ्यांच्या आसपास घुटमळताना दिसत असून, निसर्गातील असंतुलनाचे हे जिवंत चित्र समोर येत आहे.

एप्रिलमध्येच उष्णतेचा कडाका वाढल्याने नागरिकांचा कल आता शीतपेय, रसवंतीगृहांकडे झुकला आहे. थंड पेयांची मागणी वाढल्यामुळे विक्रेत्यांचा व्यवसाय तेजीत आला आहे, तर चहाच्या कपांची संख्या कमी होताना दिसत आहे. सध्या लग्नसराई सुरू असतानाही अनेक नागरिक रणरणत्या उन्हामुळे घराबाहेर पडणे टाळत असल्याचे चित्र आहे.

दरम्यान, वयोवृद्ध नागरिकांनीही चिंता व्यक्त करत “अशी उष्णता कधीच अनुभवली नव्हती,” असे सांगितले. याला मानवी हस्तक्षेपच कारणीभूत असल्याचे ते स्पष्टपणे सांगतात. झाडांची तोड, डोंगर-दऱ्यांचा ऱ्हास आणि वाढते काँक्रीटचे जंगल यामुळेच आज निसर्गाचा समतोल बिघडला असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.“प्रगतीच्या नावाखाली आपणच संकट ओढवून घेतले आहे. आता तरी शहाणपणाने निसर्ग वाचवण्याचे काम केले नाही, तर येणारी परिस्थिती आणखी भीषण असेल,” असा इशारा देत झाडे लावणे, पाण्याचे स्रोत वाढवणे आणि पर्यावरण जपणे ही काळाची गरज असल्याचे नागरिकांनी अधोरेखित केले आहे.

# काशीद समुद्रकिनारी बुडणाऱ्या दोन पर्यटकांना जीवदान; रिमोट ऑपरेटिंग बोया ठरला देवदूत

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केल्यामुळे आज काशीद समुद्रकिनारी एक मोठा अनर्थ टळला आहे पोहताना पाण्याचा अंदाज न आल्याने बुडणाऱ्या डोंबिवली येथील दोन पर्यटकांना 'रिमोट ऑपरेटिंग बोया'च्या मदतीने सुखरूप बाहेर काढण्यात यश आले आहे. फुरकन शेख (वय28) आणि कैफ शेख (वय 22) अशी या वाचवीलेल्या पर्यटकांची नावे असून, हे दोघेही सध्या सुस्थितीत आहेत.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, डोंबिवलीहून आलेले हे पर्यटक काशीद बीचवर पर्यटनासाठी आले होते. समुद्रात पोहण्याचा आनंद घेत असताना अचानक दोघेही खोल पाण्यात ओढले गेले आणि बुडू लागले. यावेळी कर्तव्यावर असलेले



पोलीस कॉन्स्टेबल श्री.रोटकर आणि जीवरक्षक शिवम लाड यांनी तत्परता दाखवत परिस्थिती हाताळली.

विशेष म्हणजे, जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या संकल्पनेतून नुकत्याच आपत्ती व्यवस्थापन विभागाला प्राप्त झालेल्या अत्याधुनिक 'रिमोट ऑपरेटिंग बोया'चा वापर या बचावकार्यात करण्यात आला. या उपकरणाच्या अचूक वापरामुळे जीवरक्षकांना बुडणाऱ्या पर्यटकांपर्यंत वेगाने पोहोचणे शक्य झाले आणि त्यांना सुखरूप बाहेर काढण्यात आले.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास प्राप्त झालेल्या निधीतून नुकतेच12 एप्रिल 2026 रोजी नागाव, काशीद आणि हरिहरेश्वर या वर्दळीच्या समुद्रकिनाऱ्यांसाठी या रिमोट ऑपरेटिंग बोयांचे वाटप करण्यात आले होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या दूरदृष्टीमुळे उपलब्ध करून देण्यात आलेले हे तंत्रज्ञान पहिल्याच काही दिवसांत दोन व्यक्तींचे प्राण वाचवण्यासाठी मैलाचा दगड ठरले आहे. या यशस्वी बचावकार्यानंतर दोन्ही पर्यटकांना त्यांच्या नातेवाईकांच्या मदतीने पुढील वैद्यकीय उपचारांसाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# केनडियर सोबत साजरा करा मदर्स डे !; केनडियर चा दागिना हा केवळ एक अलंकार नसून आईच्या व्यक्तिमत्वाचा आरसा आहे

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी** : मदर्स डे म्हणजे केवळ एक दिवसाचे सेलिब्रेशन नाही, तर आईने केलेले अगणित त्याग आणि ते करत असताना तिची ती सहज-सुंदर वागणूक, जी अनेकदा आपल्या नजरेतून सुटते, या सगळ्याचा सन्मान करण्याचा दिवस आहे. आईचे शांत समर्पण आणि तिचे निस्वार्थ प्रेम शब्दांत मांडणे कठीण आहे, पण एक देखणा दागिना तिच्या चेहऱ्यावर नक्कीच अद्वितीय चमक आणू शकतो असा दागिना जो ती केवळ खास प्रसंगीच नाही, तर दररोज



मोठ्या अभिमानाने मिरवू शकेल.

आईला भेट दिला जाणारा दागिना हा केवळ एक अलंकार नसून, आठवणींची एक सुंदर ठेव बनेल. हे दागिने आईच्या व्यक्तिमत्त्वाचा आरसा आहेत, जे तिच्या प्रत्येक रूपाला रोजच्या रोज असो वा एखादा खास सोहळा, अधिक खुलवतात. आई ही आपल्या आयुष्यातील सर्वात अनमोल व्यक्ती असते, हे दागिने तिच्या महतीचे एक सुंदर प्रतिबिंब आहेत.

कल्याण ज्वेलर्सचा लाइफस्टाइल ब्रँड 'केनडियर' खास विचारपूर्वक साकारलेले आणि परिधान करायला सहजसोपे दागिने सादर करत आहे. अगदी नाजूक नक्षीकामापासून ते प्रभावी कलाकुसरीपर्यंत, हे डिझाइन्स आईबद्दलचे तुमचे प्रेम कोणत्याही बडेजावाशिवाय, अत्यंत साधेपणाने आणि आदराने व्यक्त करतात.

स्टायलिश आणि तितकीच सहज-'रॅली' डायमंड अँड फॅन्सी जेमस्टोन रिंग 'केनडियर' ची ही 'रॅली' रोझ गोल्ड रिंग म्हणजे साधेपणा आणि सौंदर्याचा एक सुरेख संगम आहे.

प्लेन ग्लिमर डायमंड 'व्ही' रिंग-शार्प आणि मॉडर्न लूक असलेली ही 'व्ही-शेप' अंगठी तिच्या साधेपणासाठी विशेष लोकप्रिय आहे.क्लासिक ट्रेंड डायमंड कफ ब्रेसलेट- कलाकुसर आणि रंगांचा एक सुंदर मिलाफ 'केनडियर'चे हे रोझ गोल्ड ब्रेसलेट त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण बनावटीसाठी ओळखले जाते.

एन चॅंटींग फ्लोरल डायमंड आणि जेमस्टोन ब्रेसलेट- साधेपणा आणि रंगांच्या किमयेने नटलेले, 'केनडियर'चे हे रोझ गोल्ड ब्रेसलेट दिसायला जितके सुंदर आहे, तितकेच वजनाला हलके आहे.आर्मीडा डायमंड इयररिंग्स- स्टायलिश आणि चमकदार! 'केनडियर'चे हे गोल्ड इयररिंग्स त्यांच्या लाटांसारख्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेसाठी ओळखले जातात.

जिसेल डायमंड डँगल इयररिंग्स- वैशिष्ट्यपूर्ण घडण आणि मोहक चमक, 'जिसेल' डायमंड इयररिंग्स प्रत्येक लूक खुलवतात.

# रेल्वे तिकीट काढताना आता होणार वेळेची बचत

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे** : महाराष्ट्र मेट्रो कॉर्पोरेशन लिमिटेड आणि ओपन फॉर डिजिटल कॉमर्स पेटीएम सोबत पुणे आणि नागपूर मेट्रो मोबाईल क्यूआर सेवा सुरू केली आहे. या सुविधेमुळे प्रवासी आता थेट पेटीएम अँप वर मेट्रो तिकीट बुक करू शकतात आणि स्टेशनवर प्रवेशासाठी क्यू आर कोड मिळवू शकतात. यामुळे फिजिकल टोकनची गरज आता लागणार नसून स्टेशनवरील वेळ कमी होईल, ज्यामुळे प्रवास अधिक जलद आणि सोयीस्कर होईल.ही सेवा दोन्ही शहरांमधील दररोज तीन लाखांहून अधिक प्रवाशांना लाभदायक ठरणार आहे. पेटीएमने प्रवक्त्यांनी सांगितले, ही भागीदारी पुणे आणि नागपूरमधील प्रवाशांसाठी दैनंदिन प्रवास अधिक सोपा करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. मोबाइल क्यू आर तिकीट सेवेमुळे वापरकर्त्यांना पेटीएमने अँप वर तिकीट त्वरित मिळणार आहे. ज्यामुळे बुकिंगपासून प्रवासापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया अधिक जलद आणि सोयीस्कर व वेळेची बचत होणार आहे.

# १ मे आंतरराष्ट्रीय कामगार दिवस ; राजकीय पुढारी तुपाशी व कामगार उपाशी; “कामगार जाए तो जाए कहा”

कामगारवर्ग हा भारताचाच नाही तर संपूर्ण”जगाचा आधारस्तंभ” आहे,परंतु तो दिवसेंदिवस ढासळतांना दिसत आहे. सरकार आणि राजकीय पुढारी स्वतःच्या स्वार्थासाठी लोकसभा सदस्य संख्या ५४३ वरून ८५० वर नेण्याच्या प्रयत्नात आहेत. परंतु कामगारांना(देशाचा शिल्पकार)पगार, पेन्शन, भत्ते, आरोग्य सुविधा देण्यात सरकार असमर्थ असल्याचे दिसून येते.दरवर्षी १ मे हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय कामगार दिवस म्हणुन साजरा केल्या जातो.आज जगाचा विचार केला तर ८० टक्के लोक कामगारांमध्ये मोडतात यात अनेक क्षेत्रातील कामगार वर्ग दिसुन येतात.शेतीतील कामगार असो, कारखाण्यातील कामगार असो किंवा इतर कोणत्याही क्षेत्रातील कामगार असो त्याची अत्यंत दयना अवस्था दिसून येते.आज विकसीत, विकसनशील,गरीब या संपूर्ण देशातील कामगारांवर जिवन-मरणाचा प्रश्न उद्भवत आहे.आज भारताचा विचार केला तर सध्याच्या परिस्थितीत लोकसंख्येच्या बाबतीत स्फोटक आकडा दिसून येतो.भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेल्याचे युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फंडच्या आकडेवारी नुसार दिसून येते.म्हणजेच चीनच्या लोकसंख्येपेक्षा २९ लाखाने जास्त असुन जगात प्रथम क्रमांकावर आहे.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत सरकार व राजकीय पुढाऱ्यांनी कामगारांची सर्वोतोपरी मदत करण्याची नितांत गरज आहे. आपल्या देशाचा विचार केला तर मुठभर राजकीय पुढाऱ्यांजवळ अरबो-खरबो रूपयांची चल-अचल संपत्ती आहे ही संपत्ती राजकीय पुढाऱ्यांनी कामगारांच्या प्रती उपयोगात आणली तर एक मदतीचा हात समजल्या जाईल. कामगार जगाचा “शिल्पकार”मानल्या जातो. तर शेतकरी हा “अन्नदाता” मानल्या जातो.यांची भुमिका देशासाठी व जगासाठी महत्त्वाची असते. आज मंदिर-मज्जीद, कारखाने, सरकारी इमारती, ताजमहाल, गुरूद्वारा, बौद्ध विहार,कुतुबमिनार,संसद भवन, अयोध्येतील राममंदिर मोठ-मोठी गडकील्ले जे आपण पहात आहोत ते संपूर्ण कामगारांच्या मदतीने बनवीण्यात आले. परंतु आज “शिल्पकारचे” हाल-बेहाल होत असल्याचे दिसून येते. कामगार हा जगाचा मोठा “आधारस्तंभ” आहे. कामगार नाही तर काहीच नाही. हीबाब भारतासह जगाने लक्षात ठेवली पाहिजे. कामगारवर्गामध्ये अशा अनेक अडचणी दीसुन येतात की त्यांचा उदरनिर्वाह होने अत्यंत कठीण झाले आहे.आपण जर भारतातील ईपीएस-९५च्या दिड करोड निवृत्त पेंशन धारकांचा विचार केला तर त्यांना १००० ते ३००० रूपयांपर्यंत पेन्शन मिळत आहे.पेंशन वाढण्याच्या आशेने निवृत्त पेंशन धारक मोठ्या आशेने सरकारकडे पहात होते. परंतु केंद्र सरकारने त्यांच्या मागणीकडे पाठ फिरविल्याचे दिसून येते. अल्पशा पेंशनमध्ये त्यांचा उदरनिर्वाह व औषधोपचार होवु शकत नाही. त्यामुळे त्यांच्यापुढे आजही जिवन-मरनाचा प्रश्न उपस्थित आहे. असंघटीत कामगारांचा विचार केला तर त्यांची परीस्थिती आनखीनच कठीण व भयावह आहे. त्यामुळे भारतासह जगात आजच्या परिस्थितीत कामगारवर्ग अत्यंत दु:खी आणि चिंतेत दीसुन येतो. २०१९ ते २०२१ हे वर्ष संपुर्ण जगासाठी महामारीने जखडलेले वर्ष ठरले.आजही शेतकऱ्यांची गंभीर परिस्थिती आहेच त्याच्या दुप्पटीने कामगारांची गंभीर परिस्थिती दिसून येते. भारत हा शेतीप्रधान देश आहे त्याचप्रमाणे बहु लोकसंख्येचा देश आहे. कामगार वर्ग मेहनतीने देशाच्या विकासासाठी व इतर कामांसाठी हातभार लावतो परंतु त्या कामाचा मोबदला तुटपुंजा मिळतो. त्यामुळे आता समान कायदा, समान अधिकार समान संपत्ती, समान वेतन,समान पेंशन यावर विचार करण्याची वेळ आलेली आहे. एका कुटुंबाला रहाण्याकरीता कीती जागा असावी,एका कुटुंबाजवळ उदरनिर्वाह करण्याकरिता कीती संपत्ती असावी. यावर माननीय प्रधानमंत्री, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष, सुप्रिमकोर्ट, हायकोर्ट यांना विचार करण्याची वेळ आली आहे. कारण ही दु:खदायीबाब आहे की ज्यांना आपण लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी, समाजसेवक म्हणतो अशा आजि-माजी राजकीय पुढाऱ्यांच्या संपत्तीचा विचार केला तर यांच्याजवळ आज अरबो-खरबो रूपयांची चल-अचल संपत्ती दीसून येईल. म्हणजेच राजकीय पुढारी तुपाशी आणि कामगार उपाशी अशी परिस्थिती आज भारतात सर्वत्र दिसून येते. यामुळेच देशात महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां,शिक्षणाचा अवाढव्य खर्च, आरोग्य सुविधा इत्यादीसह अनेक ज्वलंत समस्यांनी जन्म घेतला आहे राजकिय पुढारी नेहमी समान अधिकाराची भाषा करतात परंतु ही सर्व राजकीय खेळी असते ही बाब सर्वांनाच लक्षात आहे. त्यामुळे करोना काळात झालेले नुकसान व जगातील सध्याची युद्धजन्य परिस्थिती पहाता आणि पुढे येणारी समस्या पहाता समान अधिकार, समान वेतन, समान संपत्ती यावर चर्चा करून नवीन कायदा सरकारने अमलात आणायला हवा. तेव्हाच कामगारवर्ग व गरीब वर्गाला दीलासा मिळेल अन्यथा श्रीमंत हा श्रीमंत होत जाईल व गरीब हा गरीबीच्या खाईत गुदमरून मरेल.करीता गरीब वर्ग व कामगार वर्ग यांच्या प्रती गांभीर्य बाळगून सरकारने कडक नियमावली आखली पाहिजे. तेव्हाच कामगार वर्ग सुखाने जगेल व योग्य न्याय प्राप्त होईल. भारत सरकारने कामगार दिनाचे औचित्य साधून कामगारांच्या प्रती मोठे पाऊल उचलण्याची गरज आहे. देशातील दिड करोड ईपीएस-१९९५ पेंशन धारकांचा प्रश्न अजुनही रडखडलेला आहे. त्यावरसुध्दा भारत सरकारने गांभीर्याने विचार करून अंतिम निर्णय घ्यायला हवा. पेंशनधारकांची एकच मागणी आहे की कमीत कमी ७५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता व आरोग्य सुविधा मिळावी.एवढे कार्य सरकारने केले तर ईपीएस-९५ चा पेन्शन धारक धन्य होईल.परंतु सरकार व ईपीएफओ पळवाटा काढतांना दिसतात. सरकारने कामगारांच्या जखमेवर फुंकर घालावी. यालाच खरा कामगार दिवस समजल्या जाईल. कारण “ज्या देशाचा कामगार सुखी तो देश सुखी” हेही तितकेच सत्य आहे.सध्याच्या परीस्थितीत कामगार चळवळी संपुष्टात आल्या आहेत.त्यामुळे सरकारच कामगारांचे सर्वेसर्वा आहेत. अशा परीस्थितीत सरकारनेच कामगारांच्या प्रती योग्य पाउले उचलुन दिलासा दिला पाहिजे.कारण भारतातीलच नाही तर संपूर्ण जगातील कामगार वर्ग अत्यंत संवेदनशील आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्यकुशलतेचा मोबदला त्यांना मिळायलाच पाहिजे.कारण कामगार हा जगाचा “आधारस्तंभ”आहे. या आधारस्तंभाला टिकवुन ठेवण्याची जबाबदारी भारतासह संपूर्ण जगाची आहे. कामगारांच्या प्रती सहानुभूती,सहकार्याची भावना सरकारने व भांडवलशाही वर्गाने अंगीकारली पाहिजे. यातच खऱ्या अर्थाने कामगार दिवसाची प्रतीमा दिसून येईल. देशाचा राजकीय पुढारी कामगार दिनाच्या निमित्ताने कामगारांना योग्य न्याय देण्याचे वचन देत असेल व त्यांच्या प्रती आदर ठेवत असेल तरच याला खऱ्या अर्थाने कामगार दिवस समजल्या जाईल.

जगातील बदलते हवामान पहाता कामगार दिनाचे औचित्य साधून भारतासह जगातील देशांनी या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करून कामगार दिवस साजरा करावा.यामुळे निसर्ग प्रफुल्लित राहील.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**( स्वतंत्र पत्रकार)**
**नागपूर.**

## पनवेल बस स्थानक उभारणीसाठी महापालिके तर्फे समन्वयक ; आमदार प्रशांत ठाकूर यांचा पाहणी दौरा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर** : अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला आणि राजकीय व्यासपीठांवर गाजलेला, पनवेलकरांच्या जिव्हाळयाचा पनवेल बस स्थानकाचा विषय आता प्रत्यक्षात मार्गी लागण्याच्या दिशेने वेग घेताना दिसत आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पार्श्वभूमीवर शहराच्या दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाणारे बस स्थानक हे पनवेलकरांसाठी ‘स्वागतद्वार’ ठरणार असून, त्याच्या उभारणीसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुन्हा एकदा सक्रिय भूमिका घेतलेली पाहायला मिळाली.





बस स्थानक उभारणीपासून तर लोकार्पणापर्यंत एन पावसाळ्याच्या तोंडावर प्रवाशांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेण्यासाठी आमदार ठाकूर यांनी शिष्टमंडळासह बस डेपो परिसराची पाहणी केली. यावेळी महापौर नितीन पाटील, एस.टी. महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी, विकासक, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार स्वतः मैदानात उतरल्याने प्रवासी व नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

या पाहणीदरम्यान बस स्थानकाच्या उभारणीसंदर्भातील विविध तांत्रिक आणि प्रशासकीय बाबींचा सखोल आढावा घेण्यात आला. पालिका व शासनस्तरीय मंजुऱ्या, बांधकामस्थळावरील वृक्षतोड, तसेच प्रकल्पातील अडथळे दूर करण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या. विशेषतः प्रवासी निवारा शेड, स्वच्छतागृहे, खड्डेमुक्त रस्ते, पावसाळ्यातील सांडपाणी निचरा आणि सुरक्षितता यांसारख्या मूलभूत सुविधांवर भर देत अधिकाऱ्यांकडून तत्काळ उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.

“बस स्थानक हे केवळ प्रवासाचे केंद्र नसून शहराची ओळख असते.

त्यामुळे पनवेल बस स्थानक आधुनिक, सुसज्ज आणि आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धर्तीवर उभारले जावे,” असे स्पष्ट करत आमदार ठाकूर यांनी दर्जात्मक कामांवर विशेष भर दिला. यामुळे पनवेल शहराला नवे आकर्षण आणि दर्जेदार ओळख मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, या प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पनवेल महानगरपालिकेमार्फत स्वतंत्र समन्वयकाची नियुक्ती करण्यात येणार असून, दर महिन्याला उभारणी टप्प्याचा प्रगती आढावा बैठका घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे कामाच्या प्रत्येक टप्प्यावर देखरेख ठेवली जाईल आणि प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यास मदत होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

एकंदरीत, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकारामुळे पनवेल बस स्थानक उभारणीच्या कामाला नवी दिशा आणि गती मिळाली असून, लवकरच प्रवाशांना आधुनिक व सुरक्षित सुविधा उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

यावेळी महापौर नितीन पाटील, महिला बालकल्याण सभापती ममता म्हात्रे यांच्यासह अनेक भाजप महायुती पदाधिकारी, कार्यकर्ते स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धर्माबादमध्ये अघोषित लोडशेडिंग; 42-43° उष्णतेत नागरिक हैराण.धर्माबादकर त्रस्त, प्रशासन मौन!

**धर्माबाद प्रतिनिधी/गिरमाजी सूर्यकार** : धर्माबाद शहरासह परिसरात गेल्या तीन ते चार दिवसांपासून विजेचा लपंडाव सुरू असून नागरिकांचे दैनंदिन जीवन अक्षरशः विस्कळीत झाले आहे. दिवस-रात्र कोणतीही पूर्वसूचना न देता वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. अनेक ठिकाणी सलग दोन ते तीन तास वीज गायब राहत असल्याने परिस्थिती अधिकच बिकट बनली आहे.

सध्या धर्माबाद परिसरात तापमान 42 ते 43 अंश सेल्सियसपर्यंत पोहोचले असून उष्णतेच्या तीव्र लाटेमुळे नागरिक आधीच त्रस्त झाले आहेत. अशा परिस्थितीत वीजपुरवठा खंडित होत असल्याने घरामध्ये उकाडा असह्य होत असून लहान मुले, महिला आणि वयोवृद्ध नागरिकांची अवस्था दयनीय झाली आहे. रात्रीच्या वेळीही वीज नसल्याने झोपेचा पूर्णतः अभाव जाणवत असून अनेकांना उष्माघाताचा धोका निर्माण झाला आहे.

वीजपुरवठा कधी खंडित होईल आणि कधी पुन्हा सुरू होईल याबाबत कोणतीही निश्चितता नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. स्थानिक वीज वितरण कार्यालयाशी संपर्क साधल्यासही समाधानकारक उत्तर मिळत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. काही ठिकाणी फोन उचलले जात नाहीत, तर काही ठिकाणी “तांत्रिक बिघाड” असल्याचे सांगून जबाबदारी टाळली जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.



या अनियमित वीजपुरवठ्यामुळे केवळ घरगुती जीवनच नव्हे तर व्यावसायिक आणि शैक्षणिक क्षेत्रावरही मोठा परिणाम होत आहे. व्यापाऱ्यांचे व्यवहार ठप्प होत असून लहान उद्योगधंद्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. विद्यार्थ्यांचे ऑनलाइन शिक्षण, अभ्यास तसेच स्पर्धा परीक्षांची तयारी यामध्ये अडथळे निर्माण होत आहेत.

ग्रामीण भागात परिस्थिती आणखी गंभीर आहे. शेतकऱ्यांना पिकांना पाणी देण्यासाठी विजेवर अवलंबून राहावे लागते. मात्र वीजपुरवठा खंडित असल्यामुळे सिंचनाचे नियोजन कोलमडले आहे. मजूर व शेतकरी उष्णतेमध्ये काम करत असताना त्यांना पाण्याची व विश्रांतीची योग्य सोय करता येत नाही. जनावरांनाही पाणीपुरवठा व थंड वातावरणाचा अभाव जाणवत असल्याने त्यांचीही अवस्था बिकट झाली आहे.

दरम्यान, काही नागरिकांनी महावितरणच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत हा प्रकार निष्काळजीपणाचा परिणाम असल्याचा आरोप केला आहे. नियमित देखभाल, तांत्रिक साहित्याची उपलब्धता आणि योग्य नियोजन यांचा अभाव असल्यामुळे ही परिस्थिती उद्भवल्याचे बोलले जात आहे.

या पार्श्वभूमीवर धर्माबादकरांनी महावितरण कंपनीकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी आवश्यक ती दुरुस्ती त्वरित करावी, नियोजित वीज खंडित असल्यास त्याची पूर्वसूचना द्यावी, तसेच नागरिकांना अचूक माहिती देण्यासाठी नियंत्रण कक्ष सक्रिय ठेवावा, अशी मागणी जोर धरत आहे. उष्णतेच्या तीव्र लाटेमध्ये वीजपुरवठा ही जीवनावश्यक सेवा ठरत असल्याने प्रशासनाने या समस्येवर तातडीने तोडगा काढावा, अन्यथा नागरिकांच्या संतापाचा उद्रेक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## डॉ.रवींद्र भोळे यांचे त्यागमय निष्काम कर्मयोगी कार्य स्फूर्तीदायक आहे - नामदार रवींद्र साठे

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी** : पुणे: वरकरणी सर्वसामान्य वाटणारे परंतु सेवाव्रती कर्मशिल्पी कार्यकर्त्यांचा एवढा मोठ्या स्तरावर सत्कार, पुरस्कार करणे ही साधी गोष्ट निश्चितच नाही. पुरस्कारामुळे प्रेरणा प्रोत्साहन मिळते व प्रेरणेमुळे राष्ट्र घडते. समाजाप्रती काहीतरी देणे आहे ही भावना प्रत्येकाने जपून प्रत्यक्षात आचरणात आणली पाहिजे. त्यागमय समर्पित कार्य करून डॉ.मणी भाई देसाईंच्या जयंतीदिनी प्रेरणा देण्याचे स्फूर्तीदायक कार्य समाजसेवक डॉ.रवींद्र भोळे करीत आहे. त्यांनी स्वतःचा विचार न करता समाजाचा विचार करून निष्काम कर्मयोगी कार्य केलेली आहेत. डॉ. रवींद्र भोळे यांचे

त्यागमय निष्काम कर्मयोगी कार्य स्फूर्तीदायक आहे असे मत नामदार रवींद्र साठे खादी आणि ग्रामोद्योग मंत्री स्वतंत्र कार्यभार मंत्रालय मुंबई यांनी येथे व्यक्त केले. मॅगसेस अवॉर्ड विनर पद्मश्री डॉ. मणीभाई देसाई यांच्या एकशे सहाव्या जयंती निमित्ताने येथे राष्ट्रीय व राज्यस्तरीय कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. पद्मश्री डॉ. मणी भाई देसाई प्रतिष्ठान क्रीडा मंत्रालय, नीती आयोग, एम एस एम इ उद्यम मंत्रालय भारत सरकार सलग्नित संस्थेच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पद्मश्री डॉ मणी भाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार समारंभात मार्गदर्शन करताना नामदार रवींद्र साठे यांनी वरील मत व्यक्त केले. याप्रसंगी व्यासपीठावर सौ ममता यशवंत पाटील, स्वीय सहाय्यक खादी ग्रामोद्योग मंत्रालय मुंबई, रमेश सुरुंग जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी, माननीय डॉ. भावार्थ देखणे, मुख्य ट्रस्टी संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थान ट्रस्ट आळंदी, कृष्णा त्र्यंबक खडसे सल्लागार लेवाभ्रातृमंडळ, जयश्री पुरुषोत्तम पाटील राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या,पीएसआय, विजय वासुदेव खर्चे राष्ट्रपती पुरस्कार विजेते अकोला, डॉ हरी निवृत्ती पाटील, प्रमोद सूर्यवंशी संपादकआम्ही मुंबईकर, सुभाष कट्यारमल अध्यक्ष जय श्रीराम शिक्षण संस्था पुणे, रुपेश ताओरी, बापूराव बबन चौधरी दैनिक महाराष्ट्राची भूमि पत्रकार, फकीरा भगवान राजगुरू साहित्यिक, प्राध्यापक दिलीप चौधरी उपाध्यक्ष लेवाभ्रातृमंडळ पुणे हे व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विकास वारके उपाध्यक्ष महाराष्ट्र लेवा महासंघ हे होते. या कार्यक्रमांमध्ये महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार, स्वर्गीय दिनकरराव भोळे (संस्थेला तीस वर्षे आर्थिक मदत देणारे आश्रयदाते)स्वर्गीय शंतनु गटने (संस्थेला तीस वर्ष स्मृतीचिन्ह पुरविणारे,) स्व तुकाराम रावबा मदने (संस्थेला तीस वर्षे पुष्पहार पुरविणारे) यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.ह्या वेळी संस्थेचे अध्यक्ष ज्येष्ठ समाजसेवक, समाज सुधारक प्रवचनकार अपंगसेवक डॉ.रवींद्र भोळे यांनी प्रास्ताविकात सांगितले की गीतेतील अध्याय दोन मधील सत्तेचाळीस व्या श्लोकानुसार पद्मश्री मणीभाई देसाई जीवन जगले. कर्मफलाची अपेक्षा न करता त्यांनी जीवन पर निष्काम कर्मयोग केला. तसेच गीतेतील अध्याय अठराव्या

अध्यायातील तिसऱ्या स्लोकानुसार त्यांनी जीवनभर आचरण केले. या अध्यायात भगवान श्रीकृष्णाने भक्तांना मार्गदर्शन केलेले आहे की प्रत्येकाने जीवनामध्ये यज्ञ, दान, तप, कर्म करणे जीवनामध्ये अत्यंत महत्त्वाचे आहे. ह्याच श्लोकानुसार पद्मश्री डॉ. मनीभाई देसाई जीवन जगले त्यांनी दुग्धोत्पादन, निसर्गोपचार, पर्यावरण, कृत्रिम गो पैदास, सामाजिक सांस्कृतिक, धार्मिक,शैक्षणिक, इत्यादी क्षेत्रांमध्ये समर्पित भावनेने महत्त्वपूर्ण कार्य करून यज्ञ ,दान, तप, कर्म साध्य केले, मनीभाईजींनी निष्काम कर्मयोग साधला ,कर्मफलाचा त्याग केला असे मत जेष्ठ समाजसेवक डॉ.रवींद्र भोळे यांनी येथे व्यक्त केले. डॉ.मणी भाई देसाई जयंती म्हणजे विभूती पूजा आहे आणि ह्या विभूती पूजेचा प्रसाद म्हणजे हा पुरस्कार आहे असे ते म्हणाले. गेली तीस वर्षापासून हा महायज्ञ सुरू आहे. याप्रसंगी पद्मश्री डॉ. मणी भाई दिसे राष्ट्रीय पुरस्कार वितरण समारंभाचे वितरण प्रमुख पाहुण्यांचे हस्ते झाले. डॉ. भावार्थ रामचंद्र देखणे, डॉ.भरत सिंह शैक्षणिक कार्य ग्रेटर नोएडा युपी, विजय वासुदेव खर्च राष्ट्रपती पुरस्कार विजेते अकोला, मुरलीधर खर्चे, हरी प्रल्हाद बढे,जितेंद्र बच्चन ज्येष्ठ पत्रकार दिल्ली, बापूराव बबन चौधरी पत्रकार महाराष्ट्राची भूमी, सौ रीना देशमुख प्राचार्य एंजल हायस्कूल, जयश्री पुरुषोत्तम पाटील राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या पीएसआय ठाणे,



रुपेश ताओरी, फकीरा भगवान राजगुरू, सौ विद्याताई यादव, डॉ. लक्ष्मण माधवराव शिवनेकर, शिवराज ज्ञानोबा साने संगीत शिक्षक,श्रीमती रश्मी नरेंद्र जोशी, डॉ.स्मिता विनायक सहस्त्रबुद्धे, प्रदीप श्रीकृष्ण पुराणिक, रज्जाक शेख, अहमद किरण साहब शेख,किरण लक्ष्मण तोडकर, विजया कौतिक जंगले, नीता यशवंत वायकोळे, दिलीप गोविंदराव डहाके, भाग्यश्री पवन कट्यारमल, अर्चना शशिकांत धूरदेव, आरती शशिकांत गाडेकर, चंद्रकांत प्यारे मॅडम, दत्ता श्रावण खंदारे, राम मिस्त्री, धनेश्वर पतंगराव भोस, हे म्हणता प्रतीक गीते, सरोज प्रभाकर आल्हाट, विवेक भागचंद्र शेलार, खेमगर वसंत बाळू, रेणुका रवींद्र पातारे, शहाजी भिकाजी शेळके, संतोष शेरकर, विठ्ठल महाराज खेडकर, समीर निंभोरे अंकुश तुकाराम भोरडे, वैद्य उद्धव ज्ञानदेव साळुंखे सत्तर सामाजिक कार्यकर्त्यांना पद्मश्री डॉक्टर मनिभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार प्रदान करण्यात आले. स्मृतिचिन्ह सन्मानपत्र शाल व पुष्पगुच्छ असेच पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी अंकुश दळवी, प्रफुल्ल झोपे, सौ किरण पाचपांडे,नॉर्मल नॉटन, एकनाथ धनवट, नितीन पारकर, नाना डोंगरे, या कार्यकर्त्यांनी व्यवस्थापन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एल.डी साळवे सर यांनी केले. आभार प्रदर्शन सुभाष कट्यारमल सर यांनी आपल्या सुमधुर स्वरात केले. शेवटी पसायदान होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.हा कार्यक्रम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक सभागृह टिंबर मार्केट येथे संपन्न झाला.